


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक १२० * नांदेड * गुरूवार, दि. ७ मे २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# सरकारी अधिकाऱ्यांसाठीच्या हिंदी परीक्षेचा निर्णय रद्द

## मोठ्या विरोधानंतर सरकारचे पाऊल मागे

**मुंबई (प्रतिनिधी)**– राज्यातील सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी होणारी हिंदी भाषेची परीक्षा आता रद्द करण्यात आली आहे. राज्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी ही माहिती दिली. २८ जून रोजी ही परीक्षा होणार होती. मनसे आणि ठाकरेंच्या शिवसेनेसोबत मराठी भाषा अभ्यास केंद्राने विरोध केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. भविष्यात सरकारी अधिकाऱ्यांना हिंदी परीक्षेची गरज आहे का नाही याची पडताळणी करणार असल्याची माहिती उदय सामंत यांनी दिली.

राज्य शासनाच्या भाषा संचालनालयाने राज्याच्या सेवेत असलेल्या राजपत्रित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी हिंदी भाषा परीक्षा घेण्याची घोषणा केली होती. पुढच्या महिन्यात, २८ जून रोजी ही परीक्षा होणार होती. भाषा संचालनालयाच्या या निर्णयाला मनसे आणि ठाकरेंच्या शिवसेनेने विरोध केला होती. मराठी भाषा अभ्यास केंद्राच्या डॉ. दीपक पवार यांनीही त्याला विरोध केला होता. त्यानंतर हा निर्णय मागे घेण्यात आला.

याबाबत प्रतिक्रिया देताना मराठी भाषा मंत्री उदय सामंत म्हणाले की, सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठीची नियोजित हिंदी भाषेची परीक्षा रदद करण्यात आली आहे. या निर्णयाबाबत आपण विभागाच्या सचिवांशी चर्चा केली आहे. १९७६ च्या नियमावलीनुसार दरवर्षी ही परीक्षा घेतली जाते. आता या परीक्षेची गरज आहे का, १९७६ चे नियम काय आहेत याची पडताळणी करणार आहोत.

भाषा संचानलायाने जाहीर केलेल्या या निर्णयाला मराठी अभ्यास केंद्राने जोरदार विरोध केला होता. मराठी भाषिक राज्यात हिंदीची परीक्षा कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्तीचा भाग म्हणून घेण्याची आवश्यकताच काय? असा सवाल मराठी भाषा अभ्यास केंद्राकडून करण्यात आला. प्रस्तावित हिंदी परीक्षा तत्काळ रद्द करावी, अन्यथा आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला होता. शासकीय कर्मचाऱ्यांना हिंदी भाषेचे ज्ञान आवश्यक करून त्यासाठी परीक्षा घेणे हा निव्वळ खोडसाळपणा आणि राजभाषा मराठीचा अवमान असल्याचा आरोप मराठी अभ्यास केंद्राने केला.

हिंदीची ही परीक्षा घेणं म्हणजे दिल्लीत बसलेल्या भैय्याना खुश करण्याचा प्रयत्न आहे. अशा पद्धतीने आमच्या मराठी कर्मचाऱ्यांवर भाषा लादली तर त्याचा तीव्र निषेध होईल. अधिकाऱ्यांनी हिंदी भाषा का शिकावी, हे राज्य सरकारने स्पष्ट करावं. जबरदस्ती केली गेली तर २८ जूनला परीक्षा केंद्रावर जो काही तमाशा होईल, त्याला राज्य शासन जबाबदार असेल, असा इशारा मनसेचे संदीप देशपांडे यांनी दिला होता.

या आधी राज्यातील शाळांमध्ये हिंदी विषय सक्तीचा करण्याच्या राज्य सरकारच्या परिपत्रकावरून दोन वर्षांपूर्वी वाद झाला होता. नंतर ते परिपत्रक सरकारने मागे घेतलं. त्यानंतर आता राजपत्रित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी हिंदीची परीक्षा ठेवण्यावरून नवा वाद सुरू झाला होता.

## सुनेत्रा पवार यांचा खासदारकीचा राजीनामा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**– महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी त्यांच्या खासदारकीचा राजीनामा उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे राजीनामा सोपवला.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार विक्रमी मतांनी विजयी झाल्या. विधानसभा निवडणुकीला सर्वाधिक मतांनी विजयी होण्याचा विक्रम त्यांच्या नावावर नोंदवला गेला आहे. बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीचा निकाल ४ मे रोजी जाहीर झाला, त्यानंतर सुनेत्रा पवार यांनी बुधवारी नवी दिल्लीत उपराष्ट्रपतींची भेट घेत त्यांनी राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा दिला. सुनेत्रा पवार यांनी राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा देण्यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्यसभेत चार खासदार होते. आता सुनेत्रा पवार यांच्या राजीनाम्यानंतर राष्ट्रवादीच्या खासदारांची राज्यसभेतील संख्या ३ इतकी राहिली आहे. राज्यसभेत राष्ट्रवादीचे तीन खासदार आहेत त्यामध्ये प्रफुल पटेल, पार्थ पवार आणि नितीन काका पाटील यांचा समावेश आहे.

# अभिनेता विजयचा राज्यपालांकडे सत्तास्थापनेचा दावा, चेन्नईत घेणार मुख्यमंत्रिपदाची शपथ

## काँग्रेसने जाहीर केला पाठिंबा



**चेन्नई (प्रतिनिधी)**– तामिळनाडूच्या राजकारणात मोठी घडामोड घडली असून अभिनेता ते राजकारणी असा प्रवास करणाऱ्या थलापती विजय यांनी सरकार स्थापनेचा दावा केला आहे. थलापती विजय यांनी राज्यपाल राजेंद्र आर्ले कर यांची भेट घेऊन सत्तास्थापनेचा दावा केला. विजय यांना काँग्रेसने पाठिंबा दर्शविला आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, विजय यांनी आपल्याला ११८ आमदारांचा पाठिंबा असल्याचं राज्यपालांना सांगितलं आहे. त्याचवेळी त्यांनी टीव्हीके पक्षाच्या १०८ आणि इतर ४ अशा ११२ आमदारांच्या सह्यांचे पत्र राज्यपालांना दिलं आहे. त्यामुळे बहुमतासाठी आवश्यक असलेल्या ११८ आमदारांच्या सह्या दाखवा, असे निर्देश राज्यपालांनी विजय यांना दिल्याची माहिती आहे.

तामिळनाडूच्या विधानसभेत थलापती विजय यांच्या टीव्हीके पक्षाला १०८ जागा मिळाल्या आहेत. तर स्टॅलिन यांच्या डीएमकेला ५९ आणि एडीएमके पक्षाला ४७ जागा मिळाल्या आहेत. त्याचवेळी काँग्रेसला ५ आणि पीएमके पक्षाला ४ जागा मिळाल्या आहेत.

दरम्यान, विजय हे ७ मे रोजी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार असल्याची माहिती असून टीव्हीकेने त्यासाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. त्याचमुळे विजय यांच्याकडून जलदगतीने हालचाल करत बहुमताचा आकडा जमवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

तामिळनाडूतील निकालानंतर विजय यांनी राज्यपालांकडे सरकार स्थापनेचा दावा सादर केला आहे. काँग्रेसच्या पाठिंब्यामुळे त्यांची ताकद आणखी वाढली असून बहुमताच्या आकड्याजवळ पोहोचण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

काँग्रेसने विजय यांच्या नेतृत्वाला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतल्याने तामिळनाडूच्या राजकारणात नवे समीकरण तयार झाले आहे. पारंपरिक द्रविड पक्षांपासून दूर जात मतदारांनी नवा पर्याय निवडल्याचे स्पष्ट झाले आहे. या पाठिंब्यामुळे विजय यांचे सरकार स्थापन करण्याचे प्रयत्न अधिक बळकट झाले आहेत.

# राज्यात सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची नियमावली जाहीर

**मुंबई (प्रतिनिधी)**– राज्यातील कर्मचाऱ्यांना कोणती निवृत्तीवेतन योजना लागू होणार, याबाबत संदिग्ध स्थिती होती. नुकत्याच झालेल्या राज्य सरकारी कर्मचारी व शिक्षक संघटनाच्या संपात याविषयी मागणी रेटण्यात आली होती. तसेच जुनी निवृत्ती वेतन योजना लागू होणार नाही, हे सुद्धा शासनाने स्पष्ट केले होते. त्याचवेळी सुधारित योजनेबाबत लवकरच आदेश काढण्याची हमी दिली होती. अखेर बुधवारी त्यावर महाराष्ट्र शासनाने आदेश काढला आहे.

राज्य शासनाने राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीअंतर्गत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी 'सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना' लागू करण्याची सविस्तर कार्यपद्धती एका शासन परिपत्रकाद्वारे जाहीर केली आहे. या निर्णयामुळे १ मार्च २०२४ पासून सेवेत असलेल्या आणि या योजनेचा पर्याय निवडणाऱ्या कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

या योजनेनुसार, ज्या कर्मचाऱ्यांची सेवा २० वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त झाली आहे, त्यांना त्यांच्या शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के निवृत्तिवेतन आणि त्यावरील महागाई वाढ लागू होईल. १० ते २० वर्षांच्या दरम्यान सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवेच्या प्रमाणात निवृत्तिवेतन दिले जाईल. या योजनेअंतर्गत किमान निवृत्तिवेतन ७,५०० रुपये निश्चित करण्यात आले असून, १० वर्षांपेक्षा कमी सेवा असलेल्यांना हे निवृत्तिवेतन लागू होणार नाही.

# पश्चिम बंगालमध्ये निवडणुकीनंतर हिंसाचार उसळला; निवडणूक आयोगाचा कडक इशारा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**– पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर राज्यात अनेक ठिकाणी हिंसाचार आणि तोडफोडीच्या घटना घडत असल्याने परिस्थिती तणावपूर्ण बनली आहे. या पार्श्वभूमीवर आता भारत निवडणूक आयोगाने कठोर भूमिका घेत संबंधित यंत्रणांना तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, हिंसाचारात सहभागी असलेल्या कोणालाही सोडले जाणार नाही आणि दोषींवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल.

दरम्यान, कोलकात्यातील न्यूटाउन परिसरात घडलेल्या एका धक्कादायक घटनेने वातावरण आणखी चिघळले आहे. भाजप कार्यकर्ता मधु मंडल यांची मारहाण करून हत्या करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेनंतर स्थानिक नागरिक आणि मृताच्या कुटुंबीयांनी संताप व्यक्त करत जोरदार निषेध आंदोलन केले. परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये म्हणून पोलिसांना लाठीचार्ज करावा लागला, ज्यामुळे परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला.

राज्यातील विविध जिल्ह्यांमधून हिंसाचार, जाळपोळ आणि तोडफोडीच्या तक्रारी सतत येत असल्याने प्रशासन सतर्क झाले आहे. निवडणूक आयोगाने राज्याचे मुख्य सचिव, पोलीस महासंचालक, कोलकाता पोलीस आयुक्त तसेच केंद्रीय सशस्त्र पोलीस दलांचे महासंचालक यांना तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत.

# 'वंदे मातरम्'चा अपमान करणे आता गंभीर गुन्हा; कायद्यात दुरुस्ती

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**– देशभक्तीशी निगडित प्रतीकांचा सन्मान अबाधित ठेवण्यासाठी केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताचा अपमान करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यासाठी केंद्राने राष्ट्रीय सन्मानाचा अपमान प्रतिबंधक कायदा, १९७१ या कायद्यात महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यास मंजुरी दिली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या ५ मे रोजी झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

या दुरुस्तीमुळे 'वंदे मातरम्' गाताना अडथळा आणणे, त्याचा अवमान करणे किंवा कार्यक्रमात त्याचा अपमानास्पद वापर करणे हे आता दंडनीय गुन्हा ठरणार आहे. सध्याच्या कायद्यानुसार राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज आणि राज्यघटनेचा अपमान केल्यास ३ वर्षांपर्यंत कारावास, दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा आहे. आता हाच नियम 'वंदे मातरम्'लाही लागू होणार असल्याने राष्ट्रीय गीतालाही समान कायदेशीर संरक्षण मिळणार आहे.

# अवैध प्रवासी वाहतूक व फुटपाथवरील अतिक्रमणाविरुद्ध शहर वाहतूक शाखेची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)**– वजिराबाद शहर वाहतूक शाखेने अवैध प्रवाशी वाहतूक, विना वाहन परवाना चालणारी वाहने, अनाधिकृत फळ गाडे, हातगाडे व इतर अशा ३५१ जणांवर कारवाई करत ३ लाख ४२ हजार ८५० रूपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी शहरात वाढत असलेली ट्राफिक समस्या आटोक्यात आणण्यासाठी शहरात चालणारी अवैध प्रवाशी वाहतूक, भरधाव वेगाने चालणारी वाहने, फटाका बुलेट, वाहन चालवताना मोबाईल फोनचा वापर करणारे, रस्त्यावर लागलेले अनाधिकृत फळांचे हातगाडे व वाहने यांच्यावर कारवाई करण्याची मोहीम राबविण्याबाबत शहर वाहतूक शाखा वजिराबाद यांना आदेशीत केले होते.



त्या अनुषंगाने सहायक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे व कर्मचारी यांच्यासमवेत रेल्वे स्टेशन रोड, महावीर चौक, कलामंदीर, वर्कशॉप, राजकॉर्नर व छत्रपती चौक या ठिकाणी वाहनांची कागदपत्रे तपासणीसह ऑटो चालकांना गणवेश परिधान करण्याबाबत सुचना देण्यात आल्या. वाहतूकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर, ट्रिपल सिट वाहने, परवाना नसलेली वाहने, रस्त्यावर लागलेले अनाधिकृत फळांचे हातगाडे, वाहने व इतर अशा ३५१ जणांवर कारवाईत करत ३ लाख ४२ हजार ८५० रूपयाचा दंड आकारण्यात आला.

वाढत असलेल्या ट्राफिकमुळे लोकांनी त्यांची चार चाकी, दोन चाकी वाहने कुठेही पार्क न करता पार्कींगचे ठिकाणी पार्क करावे, वाहतुकीस अडथळा निर्माण होईल या प्रकारे कोणतेही फळ गाडे व इतर असे रस्त्यामध्ये लाऊन अतिक्रमन करू नये, सिंग्नलचे पालन करावे व वाहतुकीस अडथळा होईल अशी कोणतीही कृती करू नये व पोलीस प्रशासनास सहकार्य करावे. अन्यथा मोटार वाहन कायदा व इतर कायद्यान्वये कडक कारवाई करण्यात येईल असे आवाहन पोलीस विभागाने केले आहे.

# 'मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी' उपक्रमाला मंजुरी; विद्यार्थ्यांना इस्रो आणि नासा भेटीची संधी


**मुंबई (प्रतिनिधी)**– राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि संशोधनवृत्ती वाढवण्यासाठी शासनाने 'मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमाला अधिकृत मान्यता देण्यात आली असून यासाठी सुमारे ३.३० कोटी रुपयांचा खर्च केला जाणार आहे, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी दिली.

या उपक्रमांतर्गत विज्ञान प्रदर्शनांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना देशातील आणि परदेशातील नामांकित संशोधन संस्थांना भेट देण्याची संधी मिळणार आहे. यामध्ये इस्रो आणि अमेरिकेतील नासा केंद्राचा समावेश आहे.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कशुद्ध विचारसरणी आणि समस्या सोडवण्याची क्षमता विकसित करणे हा आहे. संशोधन आणि नवोपक्रम यांना प्रोत्साहन देऊन विद्यार्थ्यांना भविष्यासाठी सक्षम बनवण्यावर सरकारचा भर आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाविषयी विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण व्हावी आणि अनुभवाधारित शिक्षणाला चालना मिळावी, हा यामागचा उद्देश आहे.

या योजनेअंतर्गत तालुकास्तरावर विज्ञान प्रदर्शनात प्रथम येणाऱ्या २१४८ विद्यार्थ्यांना जवळच्या विज्ञान केंद्रांना भेट दिली जाणार आहे. जिल्हास्तरावर निवड झालेल्या १८० विद्यार्थ्यांना बंगळुरू येथील इस्रो केंद्राला भेट देण्याची संधी मिळणार आहे. तसेच राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात उत्कृष्ट ठरलेल्या ५१ विद्यार्थ्यांना अमेरिकेतील नासा केंद्राला भेट देण्याची विशेष संधी देण्यात येणार आहे.




# तूर व हरभरा खरेदीला मुदतवाढ; राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा

**मुंबई (प्रतिनिधी)**– राज्यातील शेतकऱ्यांच्या मागणीचा विचार करून केंद्र शासनाने खरीप हंगाम २०२५-२६ अंतर्गत तूर व हरभरा खरेदीसाठी मुदतवाढ दिली आहे. तसेच हरभरा खरेदीत आणखी ५८ हजार ६३२ मेट्रिक टन वाढ केली असून आता राज्यात ८ लाख १९ हजार ८८२ मेट्रिक टन हरभरा खरेदी करता येणार असल्याची माहिती पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी राज्य शासनाच्या मागणीनुसार तूर खरेदीची मुदत ३१ मे २०२६ पर्यंत तर हरभरा खरेदीची मुदत २९ मे २०२६ पर्यंत वाढवून दिली आहे. तसेच हरभरा खरेदीत ५८ हजार ६३२ मेट्रिक टन उद्दिष्ट वाढवून दिले, याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चव्हाण यांचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी आभार मानले.

मंत्री जयकुमार रावल म्हणाले की, सुरुवातीला केंद्र शासनाच्या किमान आधारभूत किंमत (एमएसपी) योजनेअंतर्गत तूर खरेदीसाठी ९० दिवसांचा तर हरभरा खरेदीसाठी ६० दिवसांचा कालावधी मंजूर करण्यात आला होता. मात्र राज्यातील शेतकऱ्यांकडून मुदतवाढीची सातत्याने मागणी होत होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पणन विभागाने केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून अतिरिक्त मुदतवाढ मिळवून दिली.

किमान हमीभाव योजनेअंतर्गत तूर खरेदीला १ फेब्रुवारी २०२६ पासून सुरुवात झाली असून, १ मेपर्यंतचा कालावधी आता ३१ मे २०२६ पर्यंत वाढविण्यात आला आहे. खरीप हंगाम २०२५-२६ साठी राज्याला ३ लाख ३७ हजार मेट्रिक टन तूर खरेदीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. आतापर्यंत ३७ हजार ८०१ शेतकऱ्यांकडून ६ लाख ८२ हजार ३७ क्विंटल तूर खरेदी करण्यात आली आहे.

हरभरा खरेदीला १ मार्च २०२६ पासून सुरुवात झाली होती. आधी २९ एप्रिलपर्यंत असलेली मुदत आता २९ मे २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. हरभरा खरेदीसाठी सुरुवातीला ७ लाख ६१ हजार २५० मेट्रिक टन उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यात आणखी ५८ हजार ६३२ मेट्रिक टन वाढ करून एकूण उद्दिष्ट ८ लाख १९ हजार ८८२ मेट्रिक टन करण्यात आले आहे. आतापर्यंत ३ लाख ७ हजार ९७३ शेतकऱ्यांकडून ७६ लाख १२ हजार ४९९ क्विंटल हरभरा खरेदी करण्यात आला आहे, अशी माहिती पणन मंत्री रावल यांनी दिली.



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकल जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# ममतांचा निर्बुद्धपणा!

पश्चिम बंगालमधील विधानसभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. यामुळे त्या ठिकाणी भाजपाचाच मुख्यमंत्री होणार हे स्पष्ट आहे, पण असे असताना देखील मावळत्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी मात्र आपली बौद्धिक दिवाळीखोरी जाहीर करीत राजीनामा देणार नाही असे पत्रकार परिषदेमध्ये सांगितले. मुख्यमंत्रीपदाची जागा ही त्यांना वारसांना मिळाली असल्याचा भास झाला आहे असे दिसते. लोकशाहीमध्ये मरेपर्यंत कोणालाही कोणत्या पदावर राहता येत नसते, हे त्यांना कोणी शिकवावं? त्यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा जरी नाही दिला तरीही संविधानाने प्राप्त झालेल्या अधिकारामुळे त्यांना बाहेर काढण्यात येईल, हे नक्की. भ्रष्टाचाराचा उच्चांक झाल्याने पश्चिम बंगालतील लोकांनी त्यांच्या पक्षाला घरचा रस्ता दाखविला, पण हे अपयश त्यांना पचनी पडत नाही असे दिसते. कोणत्याही राज्यातील सत्तांतर हे केवळ एका पक्षाच्या विजयाचे प्रतीक नसून ते जनतेच्या मनातील बदलत्या अपेक्षा, असंतोष आणि नव्या आशांचा परावर्तित स्वरूप असते. त्यामुळे या निकालाकडे केवळ जय-पराजयाच्या चौकटीत न पाहता व्यापक संदर्भात पाहण्याची गरज आहे. पश्चिम बंगालमध्ये दीर्घकाळ सत्तेवर असलेल्या नेतृत्वाविरोधात मतदारांनी जर स्पष्टपणे कौल दिला असेल, तर त्यामागे काही ठोस कारणे असणे स्वाभाविक आहे. प्रशासनातील त्रुटी, भ्रष्टाचाराचे आरोप, कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न, तसेच सीमावर्ती राज्य असल्यामुळे घुसखोरीचा मुद्दा, हे सर्व घटक मतदारांच्या निर्णयावर प्रभाव टाकू शकतात. अनेकदा स्थानिक प्रश्न, बेरोजगारी, विकासाची गती आणि सामाजिक समतोल यांसारख्या बाबी मतदारांच्या प्राधान्यक्रमात अग्रस्थानी असतात. मात्र, या पार्श्वभूमीवर पराभूत नेतृत्वाची भूमिका अधिक महत्त्वाची ठरते. लोकशाहीत पराभव स्वीकारणे ही तितकीच आवश्यक बाब आहे जितकी विजय साजरा करणे. जर एखाद्या नेत्याने स्पष्ट जनादेशानंतरही पद सोडण्यास नकार दिला, तर तो लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांना बाधा पोहोचवणारा ठरू शकतो. सत्ता ही जनतेच्या विश्वासावर उभी असते आणि तो विश्वास कमी झाल्यास सत्तेवर टिकून राहण्याचा नैतिक अधिकारही कमी होतो. तथापि, अशा परिस्थितीत संवैधानिक प्रक्रिया काय सांगते, हेही लक्षात घेतले पाहिजे. केवळ राजकीय भूमिका किंवा वक्तव्ये यावरून अंतिम निष्कर्ष काढणे योग्य नाही. राज्यघटनेनुसार बहुमत असलेल्या पक्षालाच सरकार स्थापनेचा अधिकार मिळतो आणि राज्यपाल, विधानसभा प्रक्रिया यामार्फत पुढील घडामोडी निश्चित होतात. त्यामुळे कोणताही राजकीय तणाव असला तरी तो घटनात्मक चौकटीतच सोडवला गेला पाहिजे. घुसखोरीचा मुद्दा हा पश्चिम बंगालसारख्या सीमावर्ती राज्यात नक्कीच गंभीर आहे. बांगलादेशाशी लागून असलेली सीमा, त्यातून होणारी अवैध हालचाल, तसेच त्याचा स्थानिक सुरक्षेवर आणि संसाधनांवर होणारा परिणाम याकडे दुर्लक्ष करता येत नाही. मात्र, या विषयाकडे पाहताना भावनिक किंवा राजकीय भाष्यांपेक्षा तथ्याधारित आणि धोरणात्मक उपाययोजना महत्त्वाच्या ठरतात. केंद्र आणि राज्य सरकार यांच्यातील समन्वय, सीमासुरक्षेची मजबुती आणि स्थानिक प्रशासनाची कार्यक्षमता या गोष्टी निर्णायक असतात. भ्रष्टाचाराचे आरोप हे कोणत्याही सत्ताधारी पक्षासाठी घातक ठरतात. जर मतदारांनी या पार्श्वभूमीवर पर्याय निवडला असेल, तर नवीन सत्ताधाऱ्यांसाठी ती एक मोठी जबाबदारी आहे. केवळ विरोधकांवर टीका करून चालणार नाही, तर पारदर्शक आणि उत्तरदायी प्रशासन देणे ही खरी कसोटी असेल. अन्यथा जनतेचा विश्वास पुन्हा डळमळीत होण्यास वेळ लागणार नाही. लोकशाहीत सत्तांतर हा एक नैसर्गिक आणि आवश्यक घटक आहे. तो केवळ बदल घडवून आणत नाही, तर सत्ताधाऱ्यांना सतत सजग ठेवतो. त्यामुळे पराभूत पक्षाने आत्मपरीक्षण करणे आणि नव्या उर्जेने जनतेसमोर उभे राहणे ही अपेक्षा असते. त्याचवेळी विजयी पक्षानेही संयम, समावेशकता आणि जबाबदारीचे भान ठेवणे गरजेचे आहे. पश्चिम बंगालमधील घडामोडी या केवळ एका राज्यापुरत्या मर्यादित नाहीत, तर त्या देशातील लोकशाहीच्या आरोग्याचेही द्योतक आहेत. जनतेचा कौल सर्वोच्च मानून सर्व पक्षांनी घटनात्मक मार्गाने पुढे जाणे, हेच लोकशाही बळकट करण्याचे खरे लक्षण ठरेल.

# माणसं भावनिकदृष्ट्या 'डिस्कनेक्टेड' का होतायेत?



आजच्या डिजिटल युगात संवादाचे माध्यम वाढले असले तरी प्रत्यक्ष संवाद कमी होत चालला आहे. सोशल मीडियावर 'कनेक्टेड' असले तरी भावनिकदृष्ट्या 'डिस्कनेक्टेड' असण्याची समस्या वाढत आहे. त्यामुळे प्रत्यक्ष संवाद, सहानुभूती आणि मानवी स्पर्श यांचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. आजच्या वेगवान, तांत्रिक आणि स्पर्धात्मक जगात माणूस प्रगतीच्या शिखरावर पोहोचत असताना एक मूलभूत प्रश्न अधिक तीव्रतेने समोर येत आहे. तो म्हणजे मानवी नातेसंबंधांचे गुंतागुंतीचे जाळे कसे सांभाळायचे? समाजात राहूनही एकाकीपणाची भावना वाढत चालली आहे. 'लोकांच्या गर्दीत एकटे' ही अवस्था आता अपवाद राहिलेली नाही, तर ती अनेकांच्या दैनंदिन आयुष्याचा भाग बनली आहे. काही जण परिस्थितीमुळे एकाकी झाले आहेत, तर काहींनी जाणीवपूर्वक हा मार्ग निवडला आहे. परंतु या दोन्ही प्रवाहांच्या मागे एकच मूळ कारण दिसते की नात्यांमधील गुंतागुंत आणि त्यातून होणारे भावनिक आघात.

मानवी नातेसंबंधांमध्ये दुखावले जाणे किंवा इतरांना दुखावणे हे जवळजवळ अपरिहार्य आहे. त्यामुळे काही लोक या त्रासापासून वाचण्यासाठी एकटेपणाचा मार्ग स्वीकारतात. मात्र, हा उपाय तात्पुरता असला तरी दीर्घकाळासाठी तो अधिक घातक ठरू शकतो. कारण माणूस हा मूलतः सामाजिक प्राणी आहे. जन्मापासून ते आयुष्याच्या शेवटपर्यंत त्याला इतरांच्या आधाराची गरज असते. त्यामुळे नात्यांपासून दूर जाणे हा उपाय नसून, त्या नात्यांना समजून घेणे आणि त्यांचे सुयोग्य व्यवस्थापन करणे ही खरी गरज आहे.

आजच्या काळात 'पीपल मॅनेजमेंट' म्हणजेच लोकांशी प्रभावीपणे वागण्याची कला अत्यंत महत्त्वाची ठरते. ही केवळ कार्यालयीन व्यवस्थापनापुरती मर्यादित नसून, ती आपल्या दैनंदिन आयुष्यातही तितकीच आवश्यक आहे. विविध विचारसरणी, संस्कार, श्रद्धा आणि मानसिकता असलेल्या लोकांशी संवाद साधताना संयम, समजूतदारपणा आणि सहानुभूती यांचा समतोल राखणे आवश्यक ठरते. प्रत्येक व्यक्तीच्या वागणुकीमागे तिच्या संगोपनाचा आणि वातावरणाचा प्रभाव असतो, हे लक्षात घेतल्यास मतभेदांचे स्वरूप अधिक स्पष्ट होते.

संवाद ही नातेसंबंधांची कळी आहे. मात्र, अनेकदा आपण आपला संदेश स्पष्टपणे मांडण्याऐवजी गुंतागुंतीच्या भाषेत बोलतो, ज्यामुळे गैरसमज निर्माण होतात. प्रत्येक व्यक्तीनुसार संवादाची शैली बदलणे आवश्यक आहे. कार्यालयातील औपचारिक संवाद घरगुती नात्यांमध्ये उपयोगी पडेलच असे नाही. त्याचप्रमाणे, घरातील अनौपचारिकता कार्यस्थळी चालत नाही. त्यामुळे परिस्थितीनुरूप संवाद साधण्याची कला आत्मसात करणे अत्यंत गरजेचे आहे.

याचबरोबर, स्वतःची जाणीव (डशश्रष-रुरीशपशीीी) ही लोकांशी व्यवहार करताना सर्वात महत्त्वाची गोष्ट ठरते. आपण कसे बोलतो, कसे ऐकतो आणि इतरांविषयी कितपत सहानुभूती बाळगतो, याचा प्रामाणिक आढावा घेणे आवश्यक आहे. इतरांकडून मिळणारा अभिप्राय स्वीकारून स्वतःमध्ये सुधारणा करणे ही प्रगतीची पहिली पायरी आहे. अनेकदा आपण समोरच्या व्यक्तीचे म्हणणे पूर्ण ऐकण्याआधीच मत तयार करतो. ही प्रवृत्ती बदलणे गरजेचे आहे.

मतभेद हे कोणत्याही नात्याचा अविभाज्य भाग आहेत. घर असो किंवा कार्यालय सर्वच ठिकाणी विचारांमध्ये भिन्नता असते. मात्र, या मतभेदांना संघर्षात रूपांतर होऊ न देणे हीच खरी कसोटी आहे. शांत राहून, सर्वांचे मत ऐकून आणि परस्पर सहमतीने निर्णय घेण्याची वृत्ती विकसित करणे आवश्यक आहे. यामुळे नात्यांमध्ये विश्वास वाढतो आणि सहकार्याची भावना दृढ होते.

विश्वास हा कोणत्याही नात्याचा पाया आहे. एकमेकांवर विश्वास ठेवणे, दिलेल्या जबाबदाऱ्या वेळेत पूर्ण करणे आणि गोपनीयता राखणे या गोष्टी नातेसंबंध अधिक मजबूत करतात. त्याचप्रमाणे, चूक झाल्यास ती स्वीकारणे, माफी मागणे आणि संवाद सुरू ठेवणे या गुणांमुळे व्यक्तिमत्त्व अधिक प्रभावी बनते. हे गुण व्यक्तीला उंचावतात आणि नात्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण करतात.

आयुष्यात आपण किती यश मिळवले यापेक्षा आपण लोकांशी कसे वागलो, हेच अधिक महत्त्वाचे ठरते. नातेसंबंध टिकवण्यासाठी परस्पर आदर, समजूतदारपणा आणि प्रामाणिकपणा या मूल्यांना पर्याय नाही. एकाकीपणाच्या वाढत्या छायेतून बाहेर पडण्यासाठी प्रत्येकाने स्वतःमध्ये बदल घडवून आणणे आणि नात्यांना जपण्याची कला आत्मसात करणे ही काळाची गरज आहे. मानवी नात्यांची उब जपली, तरच समाज अधिक सशक्त आणि संवेदनशील राहू शकेल.

**-प्रा. सु. ग. जाधव**
नांदेड
मो. ९४२३१४०७४१

# विश्वकवी रवींद्रनाथ टागोर: शिक्षणाचा मुक्त विचार आणि आजची गरज


आज ७ मे, गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची जयंती. ज्यांनी आपल्या लेखणीने केवळ साहित्याचीच नव्हे, तर मानवी मनाची मशागत केली, त्या महान विभूतीला अभिवादन करण्याचा आणि त्यांच्या अजरामर विचारांना उजाळा देण्याचा प्रामाणिक प्रयत्न.

आजच्या धावपळीच्या आणि डिजिटल युगात टागोरांचे विचार केवळ पुस्तकात ठेवण्यासाठी नसून ते आपल्या शिक्षण पद्धतीत उतरवणे ही काळाची गरज आहे.

७ मे १८६१ रोजी कोलकात्याच्या ऐतिहासिक जोडासांको ठाकूर बाडी येथे एका समृद्ध आणि सुसंस्कृत कुटुंबात रविंद्रनाथांचा जन्म झाला. त्यांचे बालपण अतिशय शिस्तबद्ध होते, पण त्यांचे मन शाळेच्या चार भिंतींत कधीच रमले नाही. त्यांना निसर्ग, पाऊस आणि मोकळे आकाश नेहमी आकर्षित करत असे. वयाच्या अवघ्या आठव्या वर्षापासून त्यांनी कविता लिहायला सुरुवात केली. वडिलांसोबत केलेल्या हिमालय प्रवासाने त्यांच्या विचारांना एक वैश्विक दिशा दिली आणि एका छोट्या रवीचे रूपांतर पुढे जागतिक कीर्तीच्या गुरुदेवांमध्ये झाले.

१९१३ मध्ये गीतांजली या काव्यसंग्रहासाठी साहित्यातील नोबेल पुरस्कार मिळवून टागोरांनी इतिहास घडवला. हा बहुमान मिळवणारे ते पहिले भारतीय आणि पहिले आशियाई व्यक्ती ठरले. गीतांजली म्हणजे केवळ कवितांचा संग्रह नाही, तर तो ईश्वराशी आणि मानवतेशी जोडलेला एक संवाद आहे. ज्यांनी भारताचेजन गण मन आणि बांगलादेशचे अमार शोनार बांग्ला ही राष्ट्रगीते रचली, त्यांच्या शब्दांत किती अफाट सामर्थ्य असेल, याची प्रचिती आजही आपल्याला येते.

आज आपण मुलांच्या डोक्यात केवळ माहितीचा डोंगर उभा करत आहोत, पण टागोर म्हणायचे: शिक्षण म्हणजे केवळ माहिती गोळा करणे नव्हे, तर आपल्या जीवनाचा संपूर्ण सृष्टीशी मेळ घालणे होय. त्यांच्या मते, शिक्षण ही केवळ नोकरी मिळवण्यासाठी केलेली धडपड नसून, ते स्वतःला आणि जगाला समजून घेण्याचे एक साधन



आहे. टागोरांना असा समाज हवा होता जिथे चित्त, भीती शून्य असेल. आजची स्पर्धात्मक शिक्षण पद्धती मुलांच्या मनात भीती निर्माण करत आहे, जी टागोरांच्या विचारांच्या अगदी उलट आहे.

टागोरांनी निसर्गाला नेहमीच शिक्षकाचा दर्जा दिला. ते म्हणायचे: झाडे ही पृथ्वीने आकाशाला लिहिलेली कविता आहेत. आपण आज पाश्चात्य शिक्षण पद्धतीचे अंधानुकरण करत असताना निसर्गापासून दुरावत चाललो आहोत. सिमेंटच्या जंगलात बसून निसर्गाचे धडे गिरवता येत नाहीत, हे त्यांनी शांतीनिकेतनमधून जगाला दाखवून दिले. जीवनातील संघर्षाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन किती सकारात्मक होता पहा: ढग माझ्या आयुष्यात येतात, पाऊस किंवा वादळ आणण्यासाठी नाही, तर माझ्या मावळत्या सूर्याच्या आकाशात रंग भरण्यासाठी.

खरे तर, आपण अशा महान भूमीत राहतो जिथे टागोरांसारख्या थोर विभूतींनी आपल्याला योग्य दिशा दिली. पण दुर्दैवाने, ज्या भूमीने जगाला शिक्षणाचे आदर्श धडे दिले, तिथेच आज आपण आपल्या गौरवशाली विचारांचा विसर पाडून पाश्चात्य शिक्षण पद्धती मागे धावत आहोत. आपण कॉर्पोरेट जगासाठी लागणारी यंत्रे तयार करत आहोत, पण संवेदनशीलता असलेली माणसे घडवायला विसरत आहोत. ७ ऑगस्ट १९४१ रोजी या महामानवाचा देह शांत झाला. आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत त्यांनी साहित्याची आणि मानवतेची सेवा केली. मृत्यू त्यांच्यासाठी केवळ एका अध्यायाचा अंत होता, पण त्यांचे विचार आजही सूर्यप्रकाशासारखे तेजस्वी आहेत.

आजच्या आणि येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी टागोरांचे विचार हे एका अमृतासारखे आहेत. केवळ मार्कांच्या शर्यतीत न धावता, आपल्यातील सर्जनशीलता जपा. पाश्चात्य जगातील आधुनिकता नक्कीच स्वीकारा, पण आपल्या मातीतील टागोरांचे हे विचार विसरू नका. जेव्हा आपण पुन्हा एकदा निसर्ग, कला आणि मातृभाषेशी जोडू, तेव्हाच खऱ्या अर्थाने टागोरांच्या स्वप्नातील भारत घडेल. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन!

**-रोहित विलासराव भोसीकर**
संचालक : भोसीकर फुड्स, नांदेड
मो. ८८०५५७५५५५

# चर्चेतून घडवावे आपलं आयुष्य?

चर्चा कोणत्याही विषयावर व्हायलाच हवी. कारण चर्चेतून मार्ग निघतो. तसेच जो मार्ग निघतो. तो मार्ग आपलं मार्गदर्शन करणारा ठरतो वा आपलं आयुष्य घडविणारा ठरतो.

अलीकडील काळात आत्महत्या होत आहेत. कधी शेतकरी आत्महत्या तर कधी घरगुती वादातून पती पत्नीची आत्महत्या तर कधी गुण कमी मिळाले म्हणून विद्यार्थी वर्गाची होणारी आत्महत्या तर कधी सासू सुनेच्या आत्महत्या कधी आपल्या म्हातारपणाच्या वयोवृद्ध जीवनाला कंटाळून वयोवृद्धांच्या आत्महत्या. कधी स्त्रीच्या आत्महत्या तर कधी पुरुषांच्या आत्महत्या. कधी लहान बालकांच्याही आत्महत्या तर कधी तरुणवर्गाच्या आत्महत्या.

आत्महत्या होण्याला जबाबदार आहे निराशता. निराशता ही नेहमीच जीवनात येत असते. ज्याप्रमाणे सुखानंतर दुःख व दुःखानंतर सुख येतं. तशीच निराशताही येत असते. तसं पाहिल्यास आजच्या काळात कोणताच घटक सुखी नाही. साधं दगडाचं उदाहरण घेतल्यास तोही सुखी नाही. त्यालाही उन, पाऊस, थंडी, वारा झेलावं लागतं. ज्यातून त्याचे तुकडे होतात. तसा सजीव घटकही सुखी नाही. सजीव प्राण्यांनाही दुःख नसतं असं नाही. त्यांनाही दुःख असतंच. त्यांना तर जंगलात असतांना सुरक्षितता नसते. तेच दुःख. सरपटणाऱ्या प्राण्यांनाही दुःख असते सरपटावं लागते याचं. वृक्षवल्लींनाही दुःख असतंच. त्यांना एकाच जागेवर राहावं लागतं. इकडे तिकडे स्थलांतरीत होता येत नाही त्याचं. ते झाडंही आत्महत्या करतंच. कधी त्याची एखादी फांदी. हे दिसतं, अचानक झाडं वाळण. यातून त्या झाडाची आत्महत्या दिसत असते. लोकं म्हणतात की त्या झाडाला कीड लागली. परंतु असं कधीकधी होत नाही. तसं माणसांनाही दुःख असतं. परंतु त्यावर आत्महत्या हा उपाय नाही. परंतु आत्महत्या घडतातच.

आत्महत्येबाबत सांगायचं झाल्यास आत्महत्या थांबवता येवू शकतात. त्या राखताही येवू शकतात. जर आपण एखाद्या गंभीर प्रश्नांवर निराशता न बाळगता चर्चा केली तर...आपण चार लोकांना त्याबद्दल सांगीतलं तर...काहीजण काहीबाही बोलतात. बोलू शकतात. कारण त्यांना बोलण्याचा अधिकार आहे. परंतु काही लोकं असेही असतात की जे उगाच बोलत नाही तर त्यावर उपायही सांगतात. चर्चेतून आत्महत्या थांबतात.

चर्चा करणे हा आत्महत्या रोखण्याचा प्रभावी उपाय. त्यातून फक्त आत्महत्याच थांबवता येत नाही, तर त्या चर्चेतून बरेच मुद्दे तेही गुंतागुंतीचे क्लिष्ट असलेले मुद्दे सोडवता येतात. शिक्षकांच्या जीवनाचा विचार केल्यास चर्चेला अतिशय महत्व आहे.

चर्चेतून घरातील घरगुती वाद सोडवता येतात. आजच्या काळात घटस्फोटाचे प्रमाण वाढलेले आहे व या घटस्फोटाच्या वाढत्या काळात पतीपत्नींमध्ये सकारात्मक चर्चा घडून आली तर बस. त्यांच्यात घटस्फोट न होता, तो थांबून त्यांचा संसार हा चांगल्याप्रकारचा होत असतो.

काही चर्चा या सकारात्मक असतात तर काही चर्चा या नकारात्मक. सकारात्मक चर्चेतून चांगले मार्ग निघतात तर नकारात्मक चर्चेतून वाईट मार्ग. गत दहा वर्षापुर्वी अशाच स्वरुपाच्या चर्चा झाल्या की ज्यातून आजच्या सरकारी शिक्षकांच्या जीवनात उदासीनता आणली. लोकांनी आपली मुलं गत दहा वर्षापूर्वी वस्तीवस्तीत चर्चा करुन कॉन्व्हेंटला टाकली. त्यावेळेस कॉन्व्हेंटला नावे टाकण्याचा त्याचा ओघ कमी होता. परंतु आज वाढला. कारण वस्तीतील ज्या पालकांची मुलं कॉन्व्हेंटला जात होती. त्याची चर्चा वस्तीत व्हायची व वस्तीवस्तीत तशी चर्चा झाली की लोकं आपली मुलं कॉन्व्हेंटला टाकायला नेत असत. अशातच आज असा काळ आला की आज सगळीच मंडळी आपली मुलं कॉन्व्हेंटला टाकायला नेत आहेत. त्यांच्या मनात आज तरी गरीबी नाही. शिक्षण नाही. शिक्षणाचा दर्जा नाही. फक्त आहे, तो भव्यदिव्यपणा. ज्यातून गरिबांच्या घरच्या चुली पेटत नाहीत. परंतु मुलं शिक्षणासाठी कॉन्व्हेंटला असतात. शिवाय ते कॉन्व्हेंटचं शुल्क देतात. त्यासाठी कर्ज काढतात. त्याच कर्जात घरही चालतं. मग कर्ज वाढत जातं व असं कर्ज वाढलं की सर्रास आत्महत्या. परंतु कॉन्व्हेंटला मुलं शिकविणं बंद होत नाही. शिवाय ज्यावेळेस पैसे नसतात व आपल्या मुलांना अशावेळेस कॉन्व्हेंटमधून काढून सरकारी शाळेत जरी टाकतो म्हटलं तरी कॉन्व्हेंटच्या शाळेतील मंडळी मुलांच्या शिक्षणासाठी शाळा सोडण्याचे दाखले देत नाहीत. ते आपल्या कॉन्व्हेंटचं बाकी असलेलं शुल्क मागतात. ज्यातून मुलांचं पुढचं शिक्षण सुटतं व ती मुलं पुढे न शिकता हमाल बनतात. हे सगळं आज का घडतं? हे घडतं, काल दहा वर्षापुर्वीपासून होत आलेल्या चर्चेतून. काही काही चर्चा अशाच चालत असतात की ज्यातून अशा प्रकारच्या कृती घडत असतात समाजात.

महत्वाचं सांगायचं झाल्यास चर्चेतूनच घडवावे आपलं आयुष्य. असं म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. कारण चर्चेतून आपलं आयुष्य चांगलं घडत असतं, जर चर्चा सकारात्मक झाली तर...आज समाजात गरज आहे सकारात्मक चर्चेची. नकारात्मक चर्चेची नाही. सकारात्मक चर्चा व्हायला हव्यात. त्यांची शिबीरं व्हायला हवीत. शिबीरं घ्यायला हवीत. त्यातच अशा प्रकारच्या चर्चा घडवून आणलेल्या हव्यात. हे तेवढंच खरं.

**-अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# ईडन गार्डनवर भाजपची डबल सेंच्युरी



देशभरात नुकत्याच पाच विधानसभा निवडणुका पार पडल्या असून, भाजपने ही मालिका ३/२ अशी आपल्या नावे केली आहे. यापैकी प्रचंड चुरशीच्या आणि चित्तथरारक लढतीत भाजपने बंगालची वाघीण अर्थातच पुरोगाम्यांची लाडकी दीदी असलेल्या ममतांचा सपशेल पराभव केला आहे. ममतांच्या दीड दशकांच्या राजवटीचा मोदी, शहांच्या रणनिती पुढे टिकाव लागला नाही आणि भाजपने ईडन गार्डनवर दणदणीत डबल सेंच्युरी म्हणजेच दोनशेच्या वर जागा जिंकून प. बंगालवर भगवा फडकवला आहे.

झाले काय तर प. बंगाल म्हटले की त्यावर पहिले कम्युनिस्ट आणि नंतर ममतांची पोलादी पकड होती. परंतु या दोघांचेही राजकीय तन पोलादी आणि मन अपराधी होते. जणू काही आपल्याला चरायला मोकळे कुरण मिळाल्यासारखे या दोघांनीही राज्याची वाट लावली होती. मग ते बेरोजगारी असो उद्योगधंदे असो की, सामाजिक वातावरण असो. मात्र धर्मांधांना कुरवाळण्यात दोघेही एक से बढकर एक होते. कोण धर्मांधांचे जास्त लांगुलचालन करतो यात स्पर्धा असायची. या दोन्ही काळ्याकुट्ट राजवटीत सर्वात जास्त हाल झाले, दमन झाले ते हिंदूंचे.

मां, माटी, मानुषचा नारा देत कम्युनिस्टांकडून सत्ता हस्तगत केल्यावर ममतांनी तिची आभाळागत माया धर्मांध, बांगलादेशी घुसखोर आणि रोहींग्यावर कायम ठेवली. या राष्ट्रद्वेषी त्रिकुटांसाठी ममतांचे राज्य जणुकाही त्यांचे माहेरघर होते. यांच्या एकगठ्ठा मतांमुळे ममतांनी बंगालवर दीड दशक राज्य केले. मात्र या काळात हिंदू, त्यांचे सण, उत्सव आले की, त्यावर ममतांची वक्रदृष्टी व्हायची. आपल्या देशात, आपल्या राज्यात हिंदू परांगदा व्हायची वेळ आली होती. धर्मांधांना हाताशी धरून ममतांनी हिंदूंचे मनसोक्त दमन केले होते.

दिवसेंदिवस ममतांची राज्यावर पकड जशी मजबूत होत गेली तशी तिने केंद्रावर वरचढ होण्याचा प्रयत्न केला, केंद्राला डोळे दाखवू लागली होती, जुमानत नव्हती. मग ते केंद्रीय पथकाला राज्यात मज्जाव करणे असो की महत्वाची कागदपत्रे घेऊन चोरासारखे पळणे असो. हम करे सो कायदा या न्यायाने तिने बंगालची पिळवणूक केली होती. ममतांचा शासकीय अत्याचार पाहून सगळेच हतबल झाले होते, पण हे चक्रव्यूह तोडणे काळाची गरज होती. एकतर सरळसरळ राष्ट्रपती राजवट लागू करणे किंवा ममतांचा पराभव करणे हे दोन पर्याय होते. राष्ट्रपती राजवट लावली असती तर झाडून पुसून यच्चयावत पुरोगामी, विरोधक देशभर उघडेनागडे नाचले असते. मोदी, शहांनी हिटलरशाही आणली म्हणून दिवसरात्र नंगानाच केला असता.

ममता म्हटले की धरले तर चावते, सोडले तर पळते अशी अवस्था झाली होती. शेवटी भाजपने सोयऱ्याच्या जोड्याने विंचू मारायचे ठरवले आणि त्यात ते १००% यशस्वी झाले. परिकथेतल्या राक्षसाप्रमाणे ममतांचे राजकीय प्राण दडले होते अवैध मतदार, धर्मांध, बांगलादेशी घुसखोर आणि रोहिंग्यात. यासोबतच शासन, प्रशासन आणि राज्यभर विणलेले तिचे तृणमूल काँग्रेसचे जाळे यामुळे ममतांना तिच्या बालेकिल्ल्यात मात देणे अशक्य कोटीतली बाब होती. मात्र केंद्राने, निवडणूक आयोगाने ममतांची ही खेळी ओळखून एसआयआर नावाचे ब्रह्मास्त्र बाहेर काढले, जे ममता नावाच्या भस्मासूरावर तंतोतंत लागू पडले.

एसआयआर लागू होताच ममतांचा तिळपापड झाला आणि इथेच तिच्या बालेकिल्याचे बुरूज ढासळायला सुरुवात झाली. लाखो अवैध मतदार वगळल्याने मतदार याद्या स्वच्छ झाल्या. मात्र तरीदेखील मिशन बंगाल सर करायला ग्राऊंड लेव्हलवर बरेच काम बाकी होते. शासकीय यंत्रणेव्यतिरिक्त ममतांची तृणमूल फौज निवडणूक प्रक्रियेत हेराफेरी करण्यात पटाईत होती. शिवाय ममता सैनिकांची तिथे इतकी दहशत होती की निर्भयपणे मतदान होणे कठीण होते. जनतेला ममतांच्या क्रौर्याचा अंदाज असल्याने जनतेच्या मनात सुरक्षेची भावना निर्माण होणे गरजेचे होते. निवडणुका शांततेत, निकोप वातावरणात आणि निर्भयपणे पार पाडणे याची जबाबदारी केंद्र आणि निवडणूक आयोगाची होती.

ममतांच्या तृणमुलचे तिलिस्म भेदण्यासाठी अखेर राज्यात केंद्रीय राखीव दलाच्या अनेक तुकड्या तैनात करण्यात आल्या. लातों के भुत बातोंसे नहीं मानते हे सुरक्षा यंत्रणेला वेगळे सांगायची गरज नव्हती. ममतांच्या गुंडांचा पद्धतशीरपणे पाहुणचार करण्यात आला. स्थानिक भ्रष्ट यंत्रणेला या निवडणुकीपासून दोन हात दूर ठेवण्यात आले. जागोजागी सुरक्षा बल तैनात असल्याने जनतेने निर्भयपणे मतदान केले. न भुतो न भविष्यती, छप्परफाड मतदान झाले, दीड दशकापासून दडपलेल्या जनभावनेचा ज्वालामुखी फुटला आणि प. बंगालमध्ये कमळ फुलले.

अपहरण, अत्याचार, दडपशाही, धर्मांधतेचा कळस गाठलेल्या राजकीय सत्तेला जनतेने प्रचंड उत्साहाने सुपुर्द खाक केले. हेकेखोर, जिद्दी, तिरकस आणि हिंदूंचा दुःस्वास करणाऱ्या ममतांना जनतेच्या रागाचा सामना करावा लागला. ममतांना त्यांचे कर्मफळ भोवले. प.बंगालमध्ये ममतांचे क्रूर संस्थान जनतेने खालसा करताच देशभरातील हॅपी इंडेक्समध्ये अचानक वाढ झाली. सुटलो बुवा एकदाचे अशी परिस्थिती झाली. प. बंगाल जिंकणे हे केवळ भाजपसाठीच नव्हे तर देशाच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत गरजेचे होते. कारण ममतांनी प. बंगालला बांगलादेशी घुसखोर, रोहिंग्यासाठी गेटवे ऑफ इंडिया करून ठेवले होते. पुर्वोत्तरातील सात राज्यांत समन्वय आणि देशाच्या सुरक्षेसाठी ममतांचा पराभव व्हावा ही देशभरातील राष्ट्रवादी जनतेची इच्छा होती. त्याला प. बंगालच्या जनतेने उदंड प्रतिसाद दिला.

प. बंगाल सर करायला भलेही भाजपला अनेक वर्षे लागलीत, पण शेवटी तिथले कार्यकर्ते, नेते आणि जनतेचे जेवढे कौतुक करावे तेवढे कमी आहे. सोबतच मा. पंतप्रधान आणि अमित शहांनी जी रणनिती आखली, त्याला मुर्तरूप दिले, सोबतच भाजपचे स्टार प्रचारक योगी आदित्यनाथ, आसामचे मुख्यमंत्री हेमंत बिस्वा शर्मा यांनी जो घणाघाती प्रचार केला, त्याला तोड नाही. प.बंगाल पाठोपाठ आसाम मध्येही कमळ फुलले असून मुख्यमंत्री हेमंत शर्मा यांची तिथे जादू अजूनही कायम आहे. सोबतच पुडुचेरी विधानसभेतही भाजपला बहुमत मिळाले आहे. एकंदरीत काय तर केरळ, तामिळनाडू वगळता, प. बंगाल, आसाम आणि पुडुचेरी येथील जनतेने भाजपला आपला कौल दिला आहे. विरोधकांना पुरून उरत भाजप पुन्हा एकदा राजकारणात धुरंधर ठरला आहे.

**-डॉ. अनिल पावशेकर**
नागपूर
मो. ९८२२९३९२८७

# नांदेड जिल्ह्यात पाणी टंचाई निवारणासाठी ५१.५८ कोटींचा कृती आराखडा सादर

## पाणी टंचाई निवारणासाठी प्रशासन सज्ज



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील संभाव्य पाणी टंचाई लक्षात घेऊन सन २०२५-२६ या कालावधीसाठी व्यापक कृती आराखडा शासनाकडे सादर करण्यात आला असून, जानेवारी ते मार्च २०२६ आणि एप्रिल ते जून २०२६ या कालावधीसाठी एकूण सुमारे ५१.५८ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. जिल्ह्यात पाणी टंचाई उद्‌भवू नये यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

जिल्हास्तरावर पालकमंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ग्रामीण व शहरी भागासाठी पिण्याच्या पाण्याचे आरक्षण निश्चित करण्यात आले. त्यानुसार ग्रामीण भागासाठी २४.१७ दलघमी, नांदेड महानगरपालिका क्षेत्रासाठी ४९.०४ दलघमी, तर नगर परिषद क्षेत्रासाठी २६.७६१ दलघमी असे एकूण ९९.९७१ दलघमी पाणी विविध धरणे व जलाशयांमध्ये आरक्षित करण्यात आले आहे.

पाणी टंचाई निवारणासाठी विविध उपाययोजनांनाही प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये २७१ नळयोजना विशेष दुरुस्ती, १०४ तात्पुरत्या पुरक नळयोजना, ५३४ नवीन विंधन विहिरी, तसेच १३ विहिरींचे खोलकरण व गाळ काढण्याच्या कामांचा समावेश आहे. अशा एकूण ९२२ उपाययोजना मंजूर करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, ४ मे २०२६ पर्यंत जिल्ह्यातील गावे, वाड्या व तांड्यांना ५८ विहीर/बोअरवेल अधिग्रहणाद्वारे पाणीपुरवठा सुरू असून सध्या एकही टँकर सुरू करण्यात आलेला नाही.

प्रशासनाकडून पाणी टंचाई टाळण्यासाठी नियोजनबद्ध उपाययोजना राबवण्यात येत असून, नागरिकांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यावर भर दिला जात आहे.

# विविध खेळांचे उन्हाळी प्रशिक्षण शिबीर आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नांदेड व नांदेड जिल्हा एकविध खेळ संघटना यांचे संयुक्त विद्यमाने विविध खेळांच्या उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन दि. १५ ते २९ मे, २०२६ या कालावधीत सकाळ ६ ते ८ व सायंकाळी ५.३० ते ७.३० या वेळेत नांदेड जिल्ह्यातील विविध स्थळी आयोजित करण्यात येणार आहे.

याकरिता नांदेड जिल्ह्यातील एकविध खेळ संघटनेचे पदाधिकारी, क्लब, अकादमी व क्रीडा प्रशिक्षक, मार्गदर्शक यांनी ज्या खेळांचे प्रशिक्षण शिबीर आपण घेणार आहात त्या खेळांचे नाव व प्रशिक्षण स्थळ तसेच प्रशिक्षणाची वेळ सकाळ व संध्याकाळ नमूद करून तसे लेखी पत्राद्वारे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय येथे कळवावे. या उन्हाळी मोफत क्रीडा प्रशिक्षण शिबिरास सहभागी होणाऱ्या सर्व प्रशिक्षणार्थींना जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेडच्या वतीने सदरील कालावधीचे सहभाग माणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहेत.

त्याकरिता प्रशिक्षणार्थी खेळाडू मुले-मुली यांनी आपली नावे खेळबाब नमूद करावी व तसा (फॉरमॅट) फॉर्म/विहित नमुना जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात उपलब्ध करून देण्यात येईल. तरी नांदेड जिल्ह्यातील एकविध खेळ संघटना, क्लब व अकादमी यांनी आपल्या स्तरावरून उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराच्या संदर्भाने अवगत करून जास्तीत जास्त नांदेड जिल्ह्यातील खेळाडूंना सहभागी करून उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबीर यशस्वी संपन्न करावे व अधिक माहितीकरिता बालाजी शिरसीकर (रा.क्री.मा.खो-खो), चंद्रप्रकाश होनवडजकर, श्रीमती शिवकांता देशमुख (रा.क्री.मा. थलेटिक्स) यांचेशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी केले आहे.

# मधाचे गाव भंडारवाडीत प्रशिक्षण दिलेल्या मधपाळांना साहित्यांचे वाटप

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील मधाचे गाव भंडारवाडी येथे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या ३० मधपाळ लाभार्थ्यांना आग्या मधमाशा मधसंकलन (बी हन्टर्स) किट व सातेरी वसाहती संगोपनासाठी मधपेट्या वाटपाचा कार्यक्रम महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबईचे सभापती (राज्यमंत्री दर्जा) रवींद्र साठे व मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मण राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार डांगर यांच्या हस्ते नुकताच घेण्यात आला.

यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता श्रीराम पाटील, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी संजय सारंगधर, प्रमुख पाहुणे म्हणून भंडारवाडीचे सरपंच अभिमान गादेवाड, ज्ञानेश्वर जेवलेवाड, ग्रामसेवक प्रियंका डुडुळे, औद्योगिक पर्यवेक्षक रमेश यादव यांच्यासह गावकरी व प्रशिक्षणार्थी यांची उपस्थिती होती.

गावातील प्रशिक्षित लाभार्थी यांनी आग्या मधमाशा मध संकलन शास्त्रोक्त पद्धतीने मध गोळा करण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरू केले आहे. उत्पादित झालेला मध विविध शासकीय मेळावे, कृषी प्रदर्शन तसेच मुंबई येथील महालक्ष्मी सरस मधाचे स्टॉलवर मधाचे गाव भंडारवाडी या ब्रँडचा मध बॉटलिंग, लेबलिंग पॅकीग करून विक्री करण्यात येत आहे. या गावातील लोकांना आग्या माशा किट ६ व सातेरी मधपेट्या ६० असे एकूण ४ लाख ७९ हजार २१३ एवढया रकमेचे ९० टक्के अनुदानावर साहित्य वाटप करण्यात आले. यानंतर मान्यवरांनी योजनेची विस्तृत माहिती दिली. तसेच सामाईक सुविधा केंद्र बांधकामास सुरुवात करण्यात आली, अशा प्रकारे कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.

# शंकर कनिष्ठ महाविद्यालयाचे बारावी परीक्षेत घवघवीत यश

**नांदेड (प्रतिनिधी)–** कै. शंकरराव पाटील मेमोरियल एज्युकेशन सोसायटी नांदेड संचलित शंकर कनिष्ठ महाविद्यालय, कौठा ता. जि. नांदेड येथील इयत्ता बारावी बोर्ड परीक्षा २०२६ विज्ञान शाखेचा निकाल ९४.३१ टक्के, कला शाखेचा ५९.१८% तर महाविद्यालयाचा एकूण निकाल ८१.७५ टक्के लागला आहे

या परीक्षेत विज्ञान शाखेतून ओंकार किशोर पाटील गुण ५११ (८५.१७%) घेऊन प्रथम तर अशीच विठ्ठल आढाव ४८० गुण ८०% घेऊन द्वितीय, तर कु. समीक्षा तुळशीराम हिंगोले ४५४ गुण (७५.६७%) घेऊन तृतीय क्रमांक पटकावला आहे.

# कष्टकरी संघटनेचे २५ वे अधिवेशन उत्साहात संपन्न



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)–** शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी वर्गाच्या विविध प्रश्नांसाठी कार्यरत असलेल्या कष्टकरी संघटनेचे २५ वे अधिवेशन नायगाव येथील महात्मा फुले कॉलनीतील डॉ. अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक सभागृहात उत्साहात पार पडले. या अधिवेशनाला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉ. अरविंद देशपांडे होते. प्रारंभीच्या सत्रात कष्टकरी जनतेच्या समस्या आणि व्यथा यांचा सखोल ऊहापोह करण्यात आला. प्रस्तावनेत कॉ. देवराव आईलवार यांनी संघटनेच्या मागील कामाचा आढावा घेत पुढील वाटचालीची दिशा स्पष्ट केली.

प्रमुख वक्ते कॉ. रविंद्र जोशी यांनी आपल्या भाषणात शेतकरी आणि कामगार यांच्यातील ऐक्य ही काळाची गरज असल्याचे ठामपणे मांडले. अध्यक्षीय भाषणात कॉ. अरविंद देशपांडे यांनी देशांतर्गत तसेच जागतिक पातळीवरील आर्थिक धोरणांचा कष्टकरी वर्गावर होणारा परिणाम अधोरेखित करत, शेतकरी व कामगारांच्या हिताविरुद्ध असलेल्या धोरणांवर टीका केली.

दुसऱ्या सत्राचे अध्यक्षस्थान प्रसिद्ध शाहीर दिगु तुमवाड यांनी भूषविले. सहमित्र संघटनेचे कॉ. दिगांबर घायाळे यांनी आपल्या संदेशातून संघटनात्मक बांधिलकी अधोरेखित केली. यावेळी कॉ. चंद्रकांत गायकवाड देगावकर यांनी क्रांतिकारी गीत सादर केले, तर अहिल्याबाई शेळके आणि रुक्मिणीबाई डुमणे यांनी गीतांद्वारे उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

# एमपीएससी अंतर्गत जिल्हा पोलीस दलातील १६ अंमलदार झाले फौजदार

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र शासनाच्या लोकसेवा आयोगाने घेतलेल्या पोलीस विभागातील विभागीय पोलीस उपनिरीक्षक पदाची परीक्षा-२०२३ मुख्य परीक्षेचा निकाल ३० एप्रिल २०२६ रोजी आलेला आहे. त्यात एकूण १९५७ जणांची नावे आहेत. त्यात नांदेड जिल्हा पोलीस दलातील १६ पोलीस अंमलदार, पोलीस उपनिरीक्षक झाले आहेत.

पोलीस विभागात विहित वर्षानंतर पोलीस अंमलदारांना विभागीय लोकसेवा आयोगाची परीक्षा देता येते. त्यानुसार २०२३ मध्ये पार पडलेल्या मुख्य परीक्षेचा निकाल ३० एप्रिल २०२६ रोजी जाहीर झाला आहे. त्यामध्ये नांदेडच्या १६ पोलीस अंमलदारांचा समावेश आहे

नांदेडमधील १६ पोलीस अंमलदार जे पोलीस उपनिरीक्षक झाले आहेत. त्यांची नावे पुढील प्रमाणे आहेत. आमेर हमीद शरीफ (पोलीस ठाणे रामतिर्थ), विक्रम वानखेडे (नेमणूक महामार्ग केंद्र देगलूर), राहुल राठोड (नेमणूक पोलीस मुख्यालय), बापू भुसावाले (नेमणूक पोलीस मुख्यालय नांदेड), संजय च्यापलवार (नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा), सुरज कुबडे (नेमणूक जलद प्रतिसाद पथक), माधव जुन्ने (शहर वाहतूक शाखा), ज्ञानेश्वर डुकरे (नेमणूक पोलीस मुख्यालय नांदेड), सदाशिव बागडे (नेमणूक पोलीस मुख्यालय नांदेड), बाळू मरेवाड (पोलीस ठाणे मांडवी), संभाजी केंद्रे (शहर वाहतूक शाखा), गणेश जुन्ने (नेमणूक पोलीस मुख्यालय), वैभव मुंडे (नेमणूक जलद प्रतिसाद पथक), सतिश गिते ( नांदेड ग्रामीण), अश्विनी राठोड ( पोलीस ठाणे हदगाव), शाम सोनटक्के (नेमणूक मोटार परिवहन विभाग) यांचा समावेश आहे.

# स्वारातीम विद्यापीठाच्या औषधनिर्माणशास्त्र संकुलाचे राष्ट्रीय परीक्षेत यश; २९ विद्यार्थी जी-पॅट/गेट २०२६ मध्ये पात्र




**नांदेड (प्रतिनिधी)** –राष्ट्रीय स्तरावरील जी-पॅट आणि गेट २००६ परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या ऐतिहासिक यशाचा आनंद साजरा करण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील औषधनिर्माणशास्त्र संकुलामध्ये एका विशेष गौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावर्षी विद्यापीठाच्या तब्बल २९ विद्यार्थ्यांनी या परीक्षांमध्ये यश मिळवून संस्थेचे मागील सर्व विक्रम मोडीत काढले आहेत.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर होते. आपल्या भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांच्या चिकाटीचे आणि काष्टाचे कौतुक केले. या यशामध्ये प्रज्वल हलगरे (IR-४७५), आदित्य सोनी (IR-७६९) आणि श्रेया मोरे (IR-९६५) या प्रथम तीन क्रमांकांच्या गुणवंतांनी राष्ट्रीय क्रमवारीत उच्च स्थान पटकावून विशेष ठसा उमटवला.

यासोबतच जी-पॅट परीक्षेत करण गाडेकर, विश्वजित निकम, प्रीती जिलहवार, ओंकार धुळे, मंजुषा आबदार, श्रद्धा फुलझेले, महादेव अवचार, अंगद चांभारकर, पूजा जाधव, सौंदर्य भाये, राजेश गाडेकर, शशिकांत इंगोले, परमेश्वर होनशेट्टी, जीवन हागे, गौरी माके, आराधना मेश्राम, आशिष सवाणे, पप्पू मडावी, पृथ्वीराज धुमाळे, विशाल धनवे विज्ञान आणि साक्षी भालके यांनी यश मिळवले. तर ऋढए २०२६ मध्ये सुमित मुळीक, यज्ञेश सूर्यवंशी, सेजल देशमुख, विशाखा सुतार आणि अभिषेक चित्ते या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

# नांदेड येथे आज बसपाचे कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड येथे गुरुवार, दि. ७ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता शासकीय विश्रामगृह सभागृहात बहुजन समाज पार्टीचे कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

महात्मा जोतीराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराच्या अध्यक्षस्थानी व प्रमुख मार्गदर्शक म्हणून बहुजन समाज पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष ॲड. सुनिल डोंगरे हे उपस्थित राहणार असून मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र झोन प्रभारी मुकुंद सोनवणे (छ. संभाजीनगर), राज्य कार्यकारिणी सदस्य इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर, मराठवाडा झोन प्रभारी मनिषभाऊ कावळे इत्यादींची यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती राहणार आहे. या एक दिवसीय कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरास सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व बहुजन समाज बंधू भगिनींनी वेळेवर उपस्थित रहावे व प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा असे आवाहन बहुजन समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष इंजि. सुभाष भोकरे यांनी केले आहे.

# इंटरमिजिएट ब्लॉक सिग्नलिंग प्रणाली कार्यान्वित करण्यासाठी ट्राफिक ब्लॉक; एक गाडी रद्द, काही अंशतः रद्द तर काही उशिराने धावणार

**नांदेड (प्रतिनिधी)–** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात नांदेड- लिंबगाव- चुडावा मार्गावर इंटरमिजिएट ब्लॉक सिग्नलिंग प्रणाली बसवण्यासाठी १६ मे रोजी काम करण्यात येणार आहे.

या कामासाठी सकाळी ७ ते ११ असा ४ तासांचा ट्राफिक ब्लॉक आणि सकाळी ११ ते १३, २ तासांचा ट्राफिक ब्लॉक घेण्यात येणार असून, यामुळे काही गाड्यांच्या वाहतुकीवर परिणाम होणार आहे.

रद्द करण्यात आलेल्या गाड्या : गाडी क्र.७७६१६ आदिलाबाद-पूर्णा पसेंजर ही गाडी १६ मे २०२६ रोजी रद्द राहील.

अंशतः रद्द करण्यात आलेल्या गाड्या : गाडी क्र. ५७६५४ आदिलाबाद-परळी ही गाडी मुदखेड-परळी दरम्यान १६ मे २०२६ रोजी अंशतः रद्द राहील. आदिलाबाद ते मुदखेड अशी धावेल. गाडी क्र. ५७६५५ परळी-अकोला ही गाडी परळी-पूर्णा दरम्यान १६ मे २०२६ रोजी अंशतः रद्द राहील. या दिवशी पूर्णा ते अकोला अशी धावेल. गाडी क्र. ७७६१५ परळी-आदिलाबाद पसेंजर ही गाडी पूर्णा-आदिलाबाद दरम्यान १६ मे २०२६ रोजी अंशतः रद्द राहील. या दिवशी परळी ते पूर्णा अशी धावेल. गाडी क्र. १७४०९ आदिलाबाद-नांदेड एक्स्प्रेस ही गाडी माळटेकडी-नांदेड दरम्यान १६ मे २०२६ रोजी अंशतः रद्द राहील. या दिवशी आदिलाबाद ते माळटेकडी अशी धावेल.

गाडी क्र. १७४१० नांदेड-आदिलाबाद एक्स्प्रेस ही गाडी नांदेड-माळटेकडी दरम्यान १६ मे २०२६ रोजी अंशतः रद्द राहील. या दिवशी माळटेकडी ते आदिलाबाद अशी धावेल.

गाडी क्र. ७७६४५ निजामाबाद-नांदेड पसेंजर ही गाडी मुदखेड-नांदेड दरम्यान १६ मे २०२६ रोजी अंशतः रद्द राहील. या दिवशी निजामाबाद ते मुदखेड अशी धावेल.

उशिरा धावणाऱ्या गाड्या: गाडी क्र. १७६०५ काचीगुडा भगत की कोठी एक्सप्रेस ही नांदेड ते पूर्णा स्थानका दरम्यान १५ मे २०२६ रोजी सुमारे ८० मिनिटे उशिरा धावेल.

गाडी क्र. १७४२९ तिरुपती-अकोला ही नांदेड ते पूर्णा स्थानका दरम्यान १५ मे २०२६ रोजी सुमारे ८० मिनिटे उशिरा धावेल.

गाडी क्र. ०७६२१ नांदेड - हजरत निझामुद्दीन ही नांदेड ते पूर्णा स्थानका दरम्यान १६ मे २०२६ रोजी सुमारे ६० मिनिटे उशिरा धावेल. गाडी क्र. १२७१५ सचखंड सुपरफास्ट एक्स्प्रेस ही नांदेड ते पूर्णा स्थानका दरम्यान १६ मे २०२६ रोजी सुमारे ६० मिनिटे ८० मिनिटे उशिरा धावेल. गाडी क्र. १७६१८ नांदेड छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ही नांदेड ते पूर्णा स्थानका दरम्यान १६ मे २०२६ रोजी सुमारे ६० मिनिटे ८० मिनिटे उशिरा धावेल, असे रेल्वे प्रशासनाने कळविले आहे.

# पेसा क्षेत्रातील शिक्षक भरतीसाठी आ. केराम आक्रमक

## रिक्त पदे पवित्र पोर्टलवर उपलब्ध करण्याची मागणी



**किनवट (प्रतिनिधी)** –किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघातील आदिवासी, दुर्गम पेसा क्षेत्रातील शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरण्याच्या मागणीसाठी आ. भीमराव केराम यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांना पत्र दिले आहे.

किनवट व माहूर तालुक्यात गेल्या अनेक वर्षांपासून शिक्षक भरती रखडल्याने अनेक शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त आहेत. परिणामी विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होत असून, शैक्षणिक गुणवत्ता घसरत असल्याची बाब आमदार केराम यांनी पत्रातून अधोरेखित केली आहे.

राज्य शासनाकडून शिक्षक पदभरती २०२५-२६ अंतर्गत पवित्र पोर्टलवर जाहिरात प्रक्रिया सुरू होणार असल्याची माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्हा परिषद अंतर्गत पेसा क्षेत्रातील जास्तीत जास्त रिक्त पदांचा समावेश करून भरती प्रक्रिया राबवावी, अशी मागणी भीमराव केराम यांनी केली.

# आरपीएफ नांदेड विभागाकडून प्रवाशांच्या सुरक्षा व संरक्षणासाठी प्रभावी कारवाया



**नांदेड (प्रतिनिधी)** –रेल्वे संरक्षण दल नांदेड विभागाने विविध मोहिमांतर्गत यशस्वी कारवाया करून प्रवाशांची सुरक्षा, रेल्वे मालमत्तेचे संरक्षण आणि तक्रारींचे तत्काळ निवारण याबाबतची आपली बांधीलकी पुन्हा एकदा सिद्ध केली आहे.

ऑपरेशन अमानत अंतर्गत आरपीएफ आदिलाबाद यांनी रेल मदत तक्रारीवर तत्काळ कार्यवाही करत ट्रेन क्र. १७४०५ (कृष्णा एक्सप्रेस) मधील हरवलेला टॅबलेट शोधून काढला.

कोच बी-४ मधून Lenovo M²-11 टॅबलेट सुरक्षितपणे जप्त करण्यात आला व योग्य पडताळणीनंतर तो प्रवाशाच्या कुटुंबियांकडे आरपीएफ पोस्ट, आदिलाबाद येथे सुपूर्द करण्यात आला. ही कार्यवाही प्रवाशांच्या हरवलेल्या वस्तू परत मिळवून देण्यासाठी आरपीएफची तत्परता दर्शवते.

ऑपरेशन रेल सुरक्षा अंतर्गत आरपीएफ परभणी यांनी रेल्वे मालमत्ता चोरी प्रकरणात आरोपीला अटक केली. आरोपीने रेल्वे उपकेंद्रातील १.५ HP सबमर्सिबल बोअरवेल पंप चोरी केल्याची कबुली दिली. सुमारे ४२०० किमतीची ही मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. या आरोपीचा संबंध रेल्वे मालमत्ता (अनधिकृत ताबा) कायद्यांतर्गत नोंद असलेल्या प्रकरणाशी असल्याचे निष्पन्न झाले असून, त्याच्यावर पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

आरपीएफ व जीआरपी यांच्या संयुक्त पथकाने उत्कृष्ट समन्वय साधत ट्रेन क्र. १७२०६ एक्सप्रेसमधील महिला प्रवाशाच्या चोरीच्या प्रकरणाचा छडा लावला.

आरोपीला हजूर साहिब नांदेड रेल्वे स्थानक येथे अटक करून पुढील कारवाईसाठी जीआरपीच्या ताब्यात देण्यात आले आहे. चोरी गेलेल्या सोन्याच्या मंगळसूत्राच्या पुनर्प्राप्तीसाठी प्रयत्न सुरू आहेत, ज्यातून प्रवाशांच्या सुरक्षेबाबत आरपीएफची कटिबद्धता अधोरेखित होते.

ऑपरेशन उपलब्ध अंतर्गत, आरपीएफ व सीआयबी पथकाने सेलू रेल्वे स्थानकावर तत्काळ तिकिटांच्या बेकायदेशीर विक्रीत गुंतलेल्या दलालास अटक केली.

एक आरक्षित तिकीट जप्त करण्यात आले असून, आरोपी प्रवाशांकडून अतिरिक्त पैसे घेत असल्याचे कबूल केले आहे. त्याच्यावर रेल्वे कायद्याच्या कलम १४३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे. या सर्व कारवाया नांदेड विभागातील आरपीएफ कर्मचाऱ्यांची सतर्कता, दक्षता आणि व्यावसायिकता दर्शवतात. आरपीएफ सतत खालील बाबींवर कार्यरत आहे. प्रवाशांची सुरक्षा सुनिश्चित करणे, रेल्वे मालमत्तेचे संरक्षण करणे, बेकायदेशीर कृत्यांना आळा घालणे व हेल्पलाईन १३९ द्वारे तत्काळ मदत उपलब्ध करून देणे आदी सुविधा देण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

# 'एमजीएम'मध्ये एचआर समिट- २०२६ संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयात संचालिका डॉ. गीता लाठकर यांच्या मार्गदर्शनात नुकतेच एचआर समीट - २०२६ चा कार्यक्रम उत्साहात पार पडला. एचआर समीट कार्यक्रमाचा मुख्य उद्देश शैक्षणिक आणि उद्योग क्षेत्रातील दरी कमी करणे, उद्योगक्षेत्राच्या विद्यार्थ्यांकडून अपेक्षा आणि संधींबाबत मार्गदर्शन करणे हा होता.

या कार्यक्रमाला टेलीपर-फॉर्मन्स, मॉडेल एन, आयटीडी टेक, ड्रायपील, सँकी सोलुशन्स, टिसीएस, डासाल्ट सिस्टम, ओप्पो, होणारटेक आणि ॲशरे यांसारख्या नामांकित संस्थांमधील एचआर तज्ज्ञ आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने व सरस्वती वंदनाने करण्यात आली. उपस्थितांचा सत्कार महाविद्यालयातर्फे गांधी प्रतिमा आणि ग्रंथभेट देऊन करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक टिपीओ प्रा. शिवप्रसाद तितरे यांनी केले. उद्‌घाटनपर भाषणात संचालिका डॉ. गीता लाठकर म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी परिस्थितीची आव्हाने स्वीकारून कार्य केले तरच यश मिळेल.

यावेळी विविध तज्ज्ञांची मार्गदर्शनपर भाषणे झाली. यात त्यांनी कौशल्य विकास, बदलत्या परिस्थितीत जुळवून घेण्याची क्षमता आणि उद्योगाशी सुसंगत शिक्षण यांचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. शिरिष कोटगीरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. जी. सायगावी, मुंबई एमजीएमचे टिपीओ जाधव, विभागप्रमुख डॉ. अर्चना राजूरकर यांचीही समयोचित भाषणे झाली.

दुपारच्या सत्रात संगणकशास्त्र, यांत्रिकी, स्थापत्य आणि ईसीटी विभागांसाठी स्वतंत्र सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. या सत्रांमध्ये विभागीय सादरीकरण, विद्यार्थ्यांचे प्रकल्प सादरीकरण आणि उद्योग तज्ज्ञांसोबत संवाद यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेत मौल्यवान मार्गदर्शन मिळवले.

या समिटचे योग्य नियोजन टिपीओ शिवप्रसाद तितरे यांच्यासह डिपार्टमेंट समन्वयक प्रा. ऐजाज अहमद, प्रा. पंकज पवार, प्रा. हिमांशु जोशी, प्रा. चंद्रशेखर बंदेला, प्रा. देविप्रसाद तुप्तेवार आणि प्रा. रितेश बैसे यांनी उत्कृष्ट समन्वयातून यशस्वी केले. टिपीओ शिवप्रसाद तितरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. तर सूत्रसंचालन कु. अदिती माने आणि कु. उर्वशी सवाई यांनी केले.

फॅशन|संसार|सौंदर्य

सखी

# तीव्र उन्हात केसांची काळजी घ्यायची कशी?

**उन्हाळा म्हणजे त्वचेची जास्त काळजी आणि त्याचबरोबर केसांचीही जास्त काळजी आणि निगा राखणं आलंच. आपले केस हे आपल्या व्यक्तिमत्वाचा एक महत्त्वाचा भाग आहेत. अगदी लांबसडक नसले तरी मऊ मुलायम आणि चमकदार केस हे चांगल्या आरोग्याचे लक्षण नक्कीच आहेत. पण अनेकदा दुर्लक्षामुळे केस खराब होतात.धूळ, प्रदूषण आणि त्यात उन्हाळ्यात येणाऱ्या घामामुळे केस निस्तेज आणि रुक्ष होतात. साहजिकच उन्हाळ्यात केसांची देखभाल करण्याची जास्त गरज असते. उन्हाळ्यात केसांची निगा कशी राखावी यासाठी काही खास टीप्स...**



- केस स्वच्छ ठेवा : उन्हाळ्यात घाम भरपूर येतो. त्याचबरोबर कोरडी हवा, धूळ, प्रदूषण यामुळे केस खूप घाण होतात. त्यामुळे उन्हाळ्यात केस स्वच्छ ठेवणं जास्त आवश्यक आहे. नियमित वर्कआऊट, व्यायाम करणाऱ्यांनी रोज केस धुतले पाहिजेत. केस धुतल्यानंतर ते ओलसर राहू न देता पूर्ण कोरडे करा. मोठे केस असतील तर एक दिवसाआड केस धुवावेत. मात्र रोजच्या रोज हार्ड शॅम्पूने केस धुणे टाळावे.
- केस धुण्याआधी तेल लावा : उन्हाळ्यात केस अगदी कोरडे, निस्तेज होतात. केस मऊ आणि हायड्रेट होण्यासाठी खोबऱ्याचं तेल सर्वोत्तम आहे. वर्षानुवर्षे आपल्याकडे केसांना खोबरेल तेल लावण्याची पध्दत आहे. तेल थोडेसे कोमट करुन लावल्यास त्याने अधिक फायदा होतो. नियमित तेल लावल्याने केसांना उत्तम पोषण मिळतेच. पण उन्हाळ्यात खोबरेल तेल लावल्याने केसांचा रुक्षपणा कमी होतो. तुम्ही केस धुण्याआधी एक तास खोबरेल तेल लावू शकता. रात्री झोपण्याआधी तेल लावून रात्रभर तसंच ठेवल्यास त्याचा चांगला परिणाम होतो. यामुळे केस अधिक मजबूत आणि दाट तसेच निरोगी बनतात.
- चांगला शॅम्पू आणि कंडिशनरचा वापर करा : उन्हाळा असो की हिवाळा, कोणताही ऋतू असला तरी केसांसाठी नेहमी चांगल्याच प्रतीचाच शॅम्पू आणि कंडिशनर वापरा. स्वस्त किंवा जाहिरातीत पाहून शॅम्पूची निवड करू नका. तुमच्या केसांसाठी योग्य असेल तोच शॅम्पू आणि कंडिशनर वापरा. केमिकलयुक्त शॅम्पूमुळे केस आणि त्याचबरोबर स्कॅल्पही कोरडा, रुक्ष होतो, त्यामुळे शक्यतो केमिकलमुक्त शॅम्पूच वापरावा. नैसर्गिक किंवा ऑर्गेनिक शॅम्पूचा वापर करणे योग्य.
- बाहेर जाताना केसांना रुमाल बांधा : उन्हाळ्यात कडक उन्हामुळे केस खराब होऊ शकतात. त्यामध्ये रुक्षता, रखरखीतपणा येतो. त्यामुळे उन्हाळ्याच्या दिवसांत अगदी सकाळी घराबाहेर पडणार असाल तरी डोक्याला स्कार्फ किंवा टोपी अवश्य घाला. हा रुमाल किंवा स्कार्फ कॉटनचाच वापरावा, कारण त्यामुळे डोक्याला थंडावा मिळतो आणि ऊन्हापासूनही संरक्षण होते. उन्हापासून केसांचं संरक्षण करण्यासाठी यूव्ही फिल्टर स्प्रे, जेल किंवा क्रिमचाही वापर करु शकता. यामुळे उन्हापासून केसांचा बचाव होईल.
- केसांसाठी योग्य डाएट : केस फक्त बाहेरुनच नाही तर आतूनही निरोगी असायला हवेत. त्यासाठी योग्य ते डाएट असणं गरजेचं आहे. मजबूत, दाट केसांसाठी आहारात प्रोटिन्स, व्हिटॅमिन्सचे योग्य प्रमाण असले पाहिजे. हिरव्या भाज्या, सोयाबीन, रताळे आणि ड्रायफ्रूट्सचा समावेश अवश्य आपल्या डाएटमध्ये करा. यामध्ये आयर्न, बीटा-कॅरोटीन, व्हिटॅमिन-ए आणि ओमेगा-३ असतं, ज्याचा केसांना खूप फायदा होतो. जास्त तेलकट, मसालेदार, जंक फूड खाण्याने केसांवरही त्याचा परिणाम होतो. त्यामुळे चौरस आणि योग्य आहार घेणं गरजेचं आहे. त्याचप्रमाणे उन्हाळ्यात मिळणारी फळे, भाज्या भरपूर खा. काकडी, खरबूज, कलिंगड, आंबा, संत्री यांचं शक्य तितक्या जास्त सेवन करा. तसेच शहाळे, कोकम सरबत, लिंबू सरबत अशी सरबतेही अवश्य घ्या. भरपूर पाणी मात्र नक्की प्या.
- केसांवर हॉट टूल्स वापरणं टाळा : अनेक जणींना केसांसाठी हेअर स्ट्रेटनर, ड्रायर वापरण्याची सवय असते किंवा त्यांच्या व्यवसायाचा भाग म्हणून ते वापरावं लागतं. पण अशा हॉट टूल्समुळे केस तुटतात, केसांचं अतोनात नुकसान होतं. केस अगदी निस्तेज आणि रुक्ष दिसू लागतात. त्यामुळे शक्यतो या हॉट टूल्सचा वापर करु नये. अगदी करावाच लागला तर रात्री झोपताना केसांना तेलाने मसाज करावा. केसांची वेणी घालून रात्रभर तशीच ठेवावी. सकाळी उठल्यावर केस चांगल्या शॅम्पूने स्वच्छ धुऊन टाकावेत.
- केसांना दर ३ महिन्यांमध्ये ट्रिम करा : दर तीन महिन्यांनी केस ट्रिम केल्यास केस अधिक चांगले वाढतात व दाट होतात. त्यामुळे केसांना स्प्लिट एंड्स होत नाहीत आणि केस दाट दिसतात. उन्हाळ्यात केस जास्त वेगाने वाढतात. रेग्युलर ट्रिमिंग केल्याने केसांचे आरोग्य चांगले राहते आणि व्हॉल्यूमही वाढतो.

## कोरफड जेलचा वापर

कोरफड त्वचेसाठी अत्यंत गुणकारी असते तशीच केसांसाठीही चांगली आहे. उन्हाळ्यात कोरफड लावल्यास थंडावा मिळतो. केसांना कोरफड जेल लावल्यास थंडावा तर मिळतोच पण केस चमकदार, मऊ होण्यासही मदत होते. केस धुण्याआधी अर्धा तास केसांना कोरफड लावून ठेवा. त्यानंतर साध्या पाण्याने केस धुऊन टाका. कोरफड जेल खोबरेल तेलात मिक्स करुन हेअर मास्क तयार करा. हा मास्क केसांना लावल्यास केस चमकदार होतात. केसांची नियमित निगा राखणे, तेलाचा मसाज, केसांची स्वच्छता या अगदी मुलभूत गोष्टी आहेत. या गोष्टी नियमितपणे केल्यास कोणत्याही अन्य हेअर ट्रीटमेंटची गरजच भासणार नाही आणि उन्हाळ्यातही केसही सुंदर, मुलायम, चमकदार दिसतील.

# लग्नाच्या सीझनमध्ये पेस्टल कलर ट्रेंडिंगमध्ये

**लग्न असो अथवा कोणताही समारंभ, आपण स्टायलिश दिसण्यासाठी नक्कीच प्रयत्न करत असतो. मग ते कपडे असोत अथवा दागिन्यांची विविध फॅशन. सध्या ट्रेंडमध्ये नक्की काय चालू आहे याचा विचार करूनच आपण लग्नसमारंभात अथवा अन्य कार्यक्रमांना नटूनथटून, पेहराव करून जातो. लग्न म्हटलं की काही रंग डोक्यात अगदी फिक्स असतात. पण सध्या लग्नाच्या सीझनमध्ये वेगळं दिसण्यासाठी गडद रंगांची गरज भासत नाही. कारण सध्या ट्रेंडिंगमध्ये आहे ते म्हणजे पेस्टल कलर. लेटेस्ट ट्रेंडमध्ये पेस्टल रंगाची साडी, लेहंगा अथवा शराराची तुम्ही स्टाईल करून अधिक आकर्षक आणि वेगळे नक्कीच दिसू शकता. यासाठी काही युनिक आणि ट्रेंडिंग डिझाईन्सचा वापर करा आणि आम्ही दिलेल्या टिप्सचादेखील...**



## पीच पेस्टल साडी

साडी हा असा पेहराव आहे की, कोणत्याही समारंभामध्ये उठावदारच दिसतो. पण त्यातही लग्नामध्ये साडी नेसण्याचा ट्रेंड हा कधीही जुना होत नाही. पेस्टल रंगांमध्ये पीच पेस्टल साडी ही लग्नामध्ये तुम्ही नेसली तर ती अधिक आकर्षक आणि लक्षवेधी ठरते. पेस्टल रंगाची सिक्विन साडी असो अथवा चिकनकारी साडी असो तुम्ही ही स्टाईल नक्की ट्राय करू शकता. बाजारामध्ये साधारणतः २००० ते ३००० च्या किमतीत ही साडी तुम्हाला आरामात मिळते. त्यावर त्याला साजेसे दागिने घालून तुम्ही तुमचा लुक पूर्ण करू शकता. आता या साडीसह नक्की काय घालावे असा प्रश्न जर तुम्हाला मनात येत असेल तर या साडीसह तुम्ही मोत्यांचे दागिने घालून परफेक्ट लुक मिळवा. तसंच या स्टाईलची आणि पेस्टल रंगांची साडी प्लस साईज बॉडी टाईफ असल्यास अत्यंत सुंदर दिसते. त्यामुळे लग्नामध्ये एकदा या रंगाच्या साडीची फॅशन नक्की करून पाहा.

## ग्रीन पेस्टल लेहंगा

लेहंगा ट्रेंडही सध्या खूपच मुलींना आवडत आहे. ज्या मुलींना साडी सांभाळता येत नाही, त्यांच्यासाठी हा उत्तम पर्याय ठरतो. ग्रीन पेस्टल अथवा याच रंगांशी मिळताजुळता पेस्टल रंग तुम्ही लग्नासाठी लेहंगा घेताना निवडू शकता. साधारणतः ३००० ते ५००० च्या दरम्यान किमतीमध्ये लग्नासाठी बाजारात पेस्टल रंगाचा लेहंगा तुम्हाला मिळू शकतो. तुमचा खांदा ब्रॉड अर्थात थोडा मोठा असेल तर तुम्ही या लेहंग्यासह कुंदनचे दागिने घालू शकता. तसंच या पेहरावासह तुम्ही ग्लॉसी बेस मेकअप अथवा ओठांसाठी केवळ लिपग्लॉसचा वापर केल्यास, तुमचा लुक अधिक खास होतो. यावर भडक पद्धतीचा मेकअप न करता पेस्टल रंगांशी मिळताजुळता मेकअप करावा जेणेकरून तुमच्याकडे अधिक लोकांचे लक्ष जाईल.

## पेस्टल पिंक शरारा

शरारा अथवा घरारादेखील सध्या ट्रेंडमध्ये आहे. ज्यांना साडी नेसायला आवडत नाही अथवा लेहंग्यामध्ये पाय अडकण्याची शक्यता वाटते त्यांनी या स्टाईलचा पर्याय निवडावा. साधारणतः १५ ते २५ वयोगटातील मुलींना ही स्टाईल शोभून दिसते. नेट फॅब्रिकने तयार करण्यात आलेला असा पेस्टल पिंक शरारा लग्नामध्ये नक्कीच आकर्षक दिसतो. तसंच पेस्टल पिंक रंग हा कोणत्याही स्किन टोनवर उठावदार दिसतो. २००० ते ३००० च्या किमतीत हा शरारा सेट तुम्ही विकत घेऊ शकता. अशा पेस्टल पिंक शरारासह तुम्ही हेव्ही इअररिंग्ज मॅच करून घालावे. तुमच्याकडे जरकन स्टोनवर्कचे कानातले असतील तर अधिक सुंदर दिसतील. याशिवाय हलकीशी हेअरस्टाईल केल्यासदेखील तुमच्या लुकला परफेक्शन मिळते. यासाठी सहसा ओपन हेअर स्टाईलची तुम्ही निवड करा. असं केल्यामुळे तुमच्या सौंदर्याला एक वेगळाज साज मिळेल यात शंका नाही.



## पेस्टल रंगांची कशी कराल स्टाईल...

- प्रोफेशनल थीमसाठी तुम्ही पेस्टल रंगांसह लाल आणि निळ्या रंगाचे कॉम्बिनेशन ट्राय करा.
- गडद रंगासाठी अर्दी कलर थीम तुम्ही वापरू शकता, जिथे तुम्हाला अधिक कॉन्ट्रास्ट रंगसंगती करावी लागते. उदाहरणार्थ - प्लम आणि रेडीश ऑरेंज अशा रंगाचे कॉम्बिनेशन कपडे तुम्ही वापरू शकता.
- क्रिस्प आणि ड्रामेटिक कलर स्किमसाठी तुम्ही राखाडी टोन्ससह खाली ब्राईट कूलर ग्रीन शेड वापरा. कूलर ब्लू हा रंग अधिक आकर्षक दिसतो. तसंच पाण्याचा निळा रंगही पेस्टलमध्ये अधिक उठावदार दिसतो.
- नैसर्गिक ब्राऊन आणि लाईट हिरव्या रंगामध्येही तुम्ही साडी वा शरारा ट्राय करू शकता.
- आईस ब्लू या रंगासह राखाडी रंग हा अत्यंत रिफ्रेशिंग आणि डोळ्यांना सुखद वाटतो.
- बबलगम गुलाबी अर्थात बबलगम पिंक आणि टरकॉईज ह्यूज या रंगाचे कॉम्बिनेशन तुमचा मूड ताजातवाना ठेवायला अत्यंत उपयोगी ठरतो.
- तुम्हाला जर लेटेस्ट आऊटफिट, रंग आणि स्टाईल याविषयी जाण असेल तर तुम्ही त्या पद्धतीने आपली स्टाईल मॅच करून घ्या. पण लग्नासाठी तुम्ही सध्या ट्रेंडिंग असणारे असे रंग नक्की एकदा ट्राय करून पाहा.

# व्हाईट अन् आयव्हरी रंगाच्या साडीची फॅशन करताना...

**व्हाईट रंगामध्येही शेड्स असतात हे तुम्हाला माहीत आहे का ? हे वाचून तुम्हाला नक्कीच आश्चर्य वाटलं असेल. ऑफव्हाईट, चॉकव्हाईट अथवा आयव्हरी असा कोणताही रंग सध्या अधिक ट्रेंडमध्ये दिसून येतोय. खरं तर हे रंग वेस्टर्न कपड्यांपेक्षा साडी आणि इंडियन वेअरमध्ये अधिक दिसून येतात. काही वर्षांपूर्वी सफेद अथवा व्हाईट रंग घालणे चांगले मानले जात नसे. पण आता ही गोष्ट फारच जुनी झाली आहे आणि फॅशन स्वरूपात आणि फॅशन जगतात आता व्हाईट रंग अधिक चांगल्या पद्धतीने स्वीकारला जात आहे. हा हॉट ट्रेंड तुम्हालाही ट्राय करायचा असेल तर तुम्ही ही स्टाईल कॅरी करण्यासाठी कोणत्या टिप्स वापरायला हव्यात हे जाणून घ्या आणि दिसा अधिक आकर्षक!**





- मोनोटोन मॅजिक : व्हाईट अथवा आयवरी साडीची स्टाईल करण्यासाठी सर्वात सोपी, बेसिक आणि फुलप्रूफ पद्धत म्हणजे मोनोटोन अर्थात पूर्ण लुक एकाच रंगात करणे. डोक्यापासून पायापर्यंत एकसमान रंग ठेवणे. पांढऱ्या अथवा ऑफव्हाईट रंगाची साडी जर तुम्ही स्टाईल करणार असाल आणि ही साडी एम्ब्रॉईडेड असेल तर तुम्ही त्यासह एक व्हाईट थ्री क्वार्टर स्लीव्ह्ज ब्लाऊज घालावा. तसंच यावर दागिने अगदी भरभरून न घालता केवळ चांदीचे कानातले घालावेत. जेणेकरून साडीवर लक्ष हटणार नाही आणि तुमचा लुक अधिक उठावदार दिसून येईल. अशी साडी असेल तर गळ्यात भरजरी दागिने घालू नका आणि मोठे कानातले घाला.
- सिक्वेन व्हाईट साडीसह लुक : ऑल व्हाईट आयव्हरी लुक थोडा कंटाळवाटा दिसू शकतो असं जर तुम्हाला वाटत असेल तर तुम्ही सिक्वेन साडीची निवड करा. होलग्राफिक सिक्विन वर्कच्या साडीमुळे एक वेगळा आणि इंटरेस्टिंग लुक निर्माण होतो. तुम्हाला जर यासह मिसमॅच करायचे असेल तर तीदेखील तुमची आवड आहे. मात्र याचाही लुक तुम्ही मोनोटोन ठेवलात तर अधिक सुंदर दिसेल. सिक्विन साडी असेल तर तुम्हाला अधिक ग्लॅमरस आणि लक्षवेधी लुक मिळतो आणि सर्वांच्या नजरा तुमच्यावर खिळून राहतात.
- स्टेटमेंट ब्लाऊज : साडी अगदी साधी असेल तर त्यासाठी तुम्ही स्टेटमेंट ब्लाऊजचा वापर करू शकता. स्टेटमेंट म्हणजे अशा सफेद साडीसह तुम्ही मल्टीकलर ब्लाऊज अथवा गडद रंगाचा भरजरी ब्लाऊज वापरलात तर अधिक सुंदर दिसेल. तुम्हीदेखील जर प्लेन व्हाईट वापरणार असाल तर तुमचा ब्लाऊज हा अप्रतिम असायला हवा. या साडीसह तुम्ही कमीत कमी प्लॅटिनम दागिन्यांचा वापर करावा. हातात ब्रेसलेट, मोठे कानातले अथवा कानातले नसल्यास नाजूक डिझाईनचा नेकलेस तुम्ही वापरल्यास, हा लुक अधिक उठावदार आणि आकर्षक दिसतो.
- कलर पॉप : ऑल व्हाईट लुक बरेचदा कंटाळवाणा वाटू शकतो. त्यामुळे हा लुक अधिक उत्तम आणि आकर्षक करण्यासाठी तुम्ही थोडा कलर पॉप करण्याची गरज आहे. पण बरेचदा पांढऱ्या रंगासह नक्की कोणता रंग वापरावा हे अनेकांना कळत नाही. तर चुकीचा रंग निवडल्यास, लुकही खराब होतो आणि पांढऱ्या साडीवरून नजर हटू शकते. त्यामुळे कोणतीही जोखीम न घेता मोनोटनी लुक ब्रेक करून गडद लिपस्टिकचा वापर करू शकता. ही लिपस्टिक तुम्हाला वेगळाच लुक मिळवून देते.
- क्लासी लुक : साडीबरोबर सहसा ब्लाऊज हा खिशाला परवडतो पण वेगळा स्टेटमेंट ब्लाऊज असेल तर मात्र अगदी आपल्या जीवावर येतं कारण बजेट नसतं. पण तुमच्या खिशाला असा ब्लाऊज परवडणार असेल तर क्लासी लुक तुम्ही नक्कीच करू शकता. साडीसह मिसमॅच ब्लाऊज अधिक सुंदर दिसतो. त्यातही कॉटनची पांढरी साडी असेल तर तुम्ही कोणत्याही स्टाईलचा ब्लाऊज घातला तर तो अधिक स्टायलिश दिसतो. यासह तुम्ही साडी आणि ब्लाऊजप्रमाणे दागिने घाला आणि आपला लुक पूर्ण करा. तुम्हीही कोणत्या लग्नात अथवा समारंभाला जाण्यासाठी पांढऱ्या, आयव्हरी अथवा ऑफ-व्हाईट रंगाची निवड करत असाल तर या टिप्स नक्की लक्षात ठेवा.



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## पूर्व पावसाळी विद्युत कामांचा सहव्यवस्थापकीय संचालक व जिल्हाधिकारी यांच्याकडून आढावा

**○ वीज अपघातास पुरक ठरणाऱ्या बॅनर्स, फ्लेक्सधारकांवर कारवाईचे निर्देश ○ देखभाल व दुरुस्तीची कामे मे अखेरपर्यंत पूर्ण करा ○ सातत्याने वीजपुरवठा खंडित भाग शोधून उपाययोजना करण्याच्या सूचना**

**नांदेड (प्रतिनिधी)** –महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जीवने यांच्या प्रमुख उपस्थितीत येथील जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवनात महावितरणकडून राबविण्यात येणाऱ्या पूर्व पावसाळी कामांचा आढावा घेण्यात आला.

बैठकीस जिल्हाधिकारी राहूल कर्डिले, महसूलचे उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांच्यासह महावितरणचे मुख्य अभियंता राजाराम माने यांची प्रमुख उपस्थिती होती. मे २०२६ अखेरपर्यंत पूर्व पावसाळी विद्युत कामे पूर्ण करून ग्राहकांना अखंडित आणि सुरळीत वीज पुरवठा करण्याचे निर्देश देण्यात आले. बैठकीस परभणीचे अधीक्षक अभियंता रुपेश टेंभूर्णे, हिंगोलीचे अधीक्षक अभियंता राजेशसिंग चव्हाण, सहायक महाव्यवस्थापक प्रदीप सातपुते, नांदेडचे प्रभारी अधीक्षक अभियंता विनय घनबहादूर यांच्यासह सर्व कार्यकारी अभियंते, अतिरिक्त कार्यकारी अभियंते, उपकार्यकारी अभियंते व सर्व विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्युत ग्राहकांना अखंडित व सुरळीत वीज पुरवठा करण्यासाठी तसेच संभाव्य समस्यांचा निपटारा करण्यासाठी पूर्व पावसाळी कामे महावितरणतर्फे हाती घेण्यात येतात. यावर्षीसुध्दा तशी कामे वेगाने पूर्ण करण्यात येत आहेत. त्यासाठी विद्युत वाहिन्यांवर अडथळा निर्माण करणाऱ्या झाडांच्या फांद्याची छटाई करणे, नादुरुस्त झालेले विजेचे खांब बदलून किंवा सरळ करून लोंबकळणाऱ्या तारा सरळ करणे, जम्प्र बदलणे, सदोष केबल शोधून ते बदलणे, नादुरुस्त इन्सुलेटर बदलणे, वारंवार वीज पुरवठा खंडित होणारा भाग शोधून आवश्यक त्या उपाययोजना करणे



यासह रोहित्रांची क्षमता वाढ किंवा अतिरिक्त रोहित्र बसवून मे अखेरपर्यंत ग्राहकांना पुरेशा दाबाने वीज पुरवठा करण्यास यंत्रणा सक्षम ठेवण्याचे निर्देश आदित्य जीवने यांनी बैठकीत दिले. तरोडा नाका, चैतन्यनगर, सांगवी हा नांदेड शहराचा विकसित भाग आहे. तेथील विजेच्या समस्या लक्षात घेऊन तेथे विद्युत उपकेंद्र उभारण्याची आवश्यकता आहे. त्या भागांना सुरळीत व अखंडित वीज पुरवठा करण्यासाठी पीरबुऱ्हाण भागात पुरेशी जागा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी बैठकीत महावितरणला सकारात्मक प्रतिसाद दिला. तसेच शहरातील वीज विकासाची व इतर कामे करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, महापालिका प्रशासन यांच्याशी महावितरणने समन्वयाने काम करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी कर्डिले यांनी दिल्या. शिवाय शहरात $CM^2$ व लघुदाब वीज वाहिन्यांच्या खांबांवर जाहिरातीसाठी लावण्यात येणारी फ्लेक्स आणि बॅनर्स जी की, वीज पुरवठा खंडित होऊन वीज अपघातास पुरक आहेत, ती काढून टाकावी व संबंधितांवर पोलिसांत गुन्हे दाखल करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

## जुगार अड्ड्यावर कारवाई; दीड लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील नांदेड ग्रामीण पोलिसांनी 'ऑपरेशन क्रॅक डाउन' अंतर्गत जुगार अड्ड्यावर मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत पाच जुगाऱ्यांना अटक करण्यात आली असून, एकूण १ लाख ४२ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



पोलीस ठाणे नांदेड ग्रामीण येथे गु.र.नं. ५०७/२०२६ कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम १८८७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई ५ मे २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास लिंबरा हिल्स कॉलनी, नांदेड येथे करण्यात आली. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी छापा टाकून आरोपींना जुगार खेळताना रंगेहात पकडले. आरोपींकडून ५२ पत्त्यांचे बंडल, रोख रक्कम ५ हजार ३०० रुपये, एक दुचाकी, पाच मोबाईल फोन असा एकूण १ लाख ४२ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अटक करण्यात आलेल्यां– मध्ये शेख शौकत शेख बाबर (वय ६०, रा. मेहनदिया कॉलनी, नांदेड), शेख बरकत शेख बशीर (वय ४३, रा. उमर कॉलनी, नांदेड), मोहम्मद सुबहान मोहम्मद खान (वय ५५, रा. हकीमिया कॉलनी, नांदेड), शेख अनवर शेख छोटेमियाँ (वय ५२, रा. हबीबिया कॉलनी, नांदेड), शेख जाहीद शेख नजीर (वय ४३, रा. हिलालनगर, नांदेड) यांचा समावेश आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी (इतवारा) प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. तसेच पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, उपनिरीक्षक चंद्रकांत कुसमे, पोलीस अंमलदार वसंत केंद्रे, विनोद पवार, मारोती पंचलिंग, शंकर माळगे, समीर अहेमद, सचिन चावरे, धम्मपाल कांबळे यांच्यासह पथकातील कर्मचाऱ्यांनी ही यशस्वी कारवाई पार पाडली. सदर प्रकरणाचा तपास सुरू असून, संबंधित आरोपींविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

### नांदासौख्यभरे

**बियाणी–जेथलिया**

नांदेड येथील रहिवासी श्रीमती ताराबाई व स्व. रामेश्वरजी बियाणी यांचे नातू आणि ॲड. दीपा व गोवर्धन बियाणी यांचे सुपुत्र चि. तेजस (सीए) यांचा शुभविवाह स्व. तुळजाबाई व स्व. जयनारायणजी जेथलिया यांची नात आणि सौ. तारादेवी व हेमराज जेथलिया यांची सुकन्या चि. सौ. कां. पायल (सीए) हिजसमवेत पार पडला. त्यानिमित्त आज गुरुवार, दि. ७ मे २०२६ रोजी सायंकाळी ७.३० वाजता एके संभाजी मंगल कार्यालय नांदेड येथे स्वागत समारोह आयोजित करण्यात आला आहे. नवदाम्पत्यांस आगामी वैवाहिक जीवनासाठी सदिच्छा!

**–मुख्यसंपादक**

## नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसाय विरोधी मोहिमेत ५२ गुन्ह्यांमध्ये ६३ जणांविरुद्ध कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)** –अवैध व्यवसाय विरोधी मोहिमेच्या पाचव्या दिवशी नांदेड परिक्षेत्रात अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध २ गुन्हे दाखल करून ९ लाख ९२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे मटका–जुगार खेळणाऱ्या व खेळविणाऱ्या एकूण २६ इसमांविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायद्यांतर्गत १६ गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्याकडून २ लाख ६६ हजार ४६५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या घटनेत अवैध दारू विक्री करणाऱ्या २६ आरोपींविरुद्ध २५ गुन्हे दाखल करून त्यांच्याकडून १ लाख २४ हजार २४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यासोबतच शस्त्र अधिनियमान्वये ४, कोटपा अन्वये ३ तर इतर अधिनियमाखाली मिळून एकूण ५२ कारवाया करण्यात आल्या आहेत. या कारवाईत निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून २५ लाख ७८ हजार २७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

उपरोक्त कारवाईत नांदेड परिक्षेत्रातील नांदेड, परभणी, हिंगोली व लातूर येथील अधिकारी व अंमलदारांनी भाग घेतला.

अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांना देता यावी या दृष्टिकोनातून पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाईन सुरू केली आहे. नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, सदर क्रमांकावर फोन करून अथवा व्हाट्सअप मेसेजद्वारे पाठवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. सदर हेल्पलाईनवर नागरिकांनी विश्वास दर्शविला असून, परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांच्या निर्मूलनासाठी सदर हेल्पलाईनची मोठी मदत होत असल्याचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी स्पष्ट केले आहे.

## नांदेड विभागांतर्गत तिकीट तपासणीत दीड कोटींचे उत्पन्न

**नांदेड (प्रतिनिधी)**– दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने एप्रिल २०२६ मध्ये तिकीट तपासणीद्वारे १.५० कोटी रुपये उत्पन्न नोंदवून एका महिन्यात आतापर्यंतचा सर्वोच्च आकडा गाठला आहे. हा आकडा एप्रिल २०२५ मधील १.३४ कोटी या मागील उच्चांकापेक्षा १२ टक्के अधिक आहे.

विभागाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांतून दि. २३ एप्रिल २०२६ रोजी ७.९१ लाख इतके एका दिवसातील सर्वाधिक उत्पन्न नोंदविण्यात आले. ही उल्लेखनीय कामगिरी तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांच्या उत्कृष्ट कार्यामुळे साध्य झाली आहे. त्यांच्या समर्पण, शिस्तबद्धता आणि



कर्तव्यनिष्ठेचा यात मोठा वाटा आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांसोबतच प्रभावी समन्वय व टीमवर्कमुळे ही यशस्वी कामगिरी शक्य झाली असल्याचे वरिष्ठांनी सांगितले.

या यशातून विभागाचा कार्यक्षम तिकीट तपासणी, विनातिकीट प्रवासावर आळा घालणे आणि प्रवासी सेवांमध्ये सुधारणा करण्यावर असलेला भर अधोरेखित होतो. नांदेड विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले यांनी सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करून आगामी काळातही अशीच कामगिरी कायम करण्याचे आवाहन केले. विविध विभागांमधील समन्वय व व्यावसायिकतेचे त्यांनी कौतुक केले. नांदेड विभाग सुरक्षित, कार्यक्षम व प्रवासी–अनुकूल सेवा देण्यास कटिबद्ध असून, भविष्यातही अशाच प्रगतीकडे वाटचाल करीत राहील, असा विश्वास व्यक्त केला.

## शिवालय उद्योग समूह आणि संध्याताई फाउंडेशनच्या वतीने पिठाच्या गिरणींचे वाटप

**नांदेड (प्रतिनिधी)**– शिवालय उद्योग समूह आणि संध्याताई फाउंडेशनच्या अध्यक्षा, संध्याताई बालाजी कल्याणकर यांच्या वतीने महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी तसेच दैनंदिन घरकामाची जबाबदारी सांभाळताना महिलांच्या कामात सुलभता यावी आणि घरगुती कामांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. बचत गटातील महिलांना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने सवलतीच्या दरात ८७१ पिठांच्या गिरण्या व ७८० शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमामुळे ग्रामीण व शहरी भागातील महिलांना स्वतःचा लघुउद्योग



सुरू करण्याची संधी उपलब्ध झाली असून, त्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होण्यास मदत होणार आहे. या कार्यक्रमामध्ये अनेक महिला बचत गटांच्या सदस्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदविला.

यावेळी बोलताना संध्याताई कल्याणकर यांनी महिलांनी आत्मनिर्भर बनून उद्योग–व्यवसायात पुढे यावे, शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, तसेच बचत गटांच्या माध्यमातून रोजगार निर्मिती करावी, असे आवाहन केले. महिलांच्या प्रगतीसाठी शिवालय उद्योग समूह व संध्याताई फाउंडेशन कायम कटिबद्ध राहील, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास विविध सामाजिक कार्यकर्ते, बचत गटांच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. महिलांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करीत संध्याताई कल्याणकर यांचे आभार मानले. या उपक्रमामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन स्वावलंबनाचा नवा मार्ग खुला झाला असल्याची भावना उपस्थित महिलांनी व्यक्त केली.

## 'राजा शिवाजी' करमुक्त करा -आ. बोंढारकर

**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित राजा शिवाजी हा चित्रपट १ मे रोजी प्रदर्शित झाला. सध्या हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर जोरदार गाजत आहे. प्रदर्शनानंतर अवघ्या तीन दिवसांत कोट्यवधींचा आकडा पार केला आहे. दरम्यान हा चित्रपट महाराष्ट्रात करमुक्त केला जावा तसेच राज्यातील शाळेतील विद्यार्थ्यांना हा चित्रपट मोफत दाखविण्यात यावा, अशी मागणी नांदेड दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी केली आहे.



छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवनकार्य, त्यांचे अद्वितीय शौर्य, दूरदृष्टी आणि स्वराज्यस्थापनेचा महान इतिहास हा महाराष्ट्राच्या तसेच संपूर्ण देशाच्या अस्मितेचा कणा आहे. त्यांनी स्थापन केलेले स्वराज्य हे केवळ राजव्यवस्था नसून न्याय, समानता, स्त्रीसुरक्षा, शेतकरी संरक्षण, धर्मनिरपेक्षतेच्या मूल्यांवर आधारित एक आदर्श शासन पद्धती होती. त्यांच्या जीवनकार्यावर आधारित प्रसिद्ध अभिनेते रितेश देशमुख लिखित, दिग्दर्शित राजा शिवाजी हा चित्रपट करमुक्त करण्यात यावा, अशी मागणी आ. बोंढारकर यांनी केली आहे. नांदेड जिल्ह्यात राजा शिवाजी चित्रपट हा प्रचंड गाजत आहे. पीव्हीआर व ई- स्केअर ही चित्रपटगृहे हाऊसफुल होत आहेत.

## पतीचा खून करणाऱ्या पत्नीस जन्मठेपेची शिक्षा

**भोकर (प्रतिनिधी)** –चारित्र्यावर संशय का घेतोस या कारणावरून संतप्त झालेल्या पत्नीने पतीस विद्युत शॉक देऊन खून केला होता. या प्रकरणी पत्नीस जिल्हा न्यायालयाने जन्मठेप व रोख दंडाची शिक्षा सुनावली आहे.

पोलीस स्टेशन उमरी हद्दीत दि. १६ जून २०१९ रोजी यातील फिर्यादी यांनी तक्रार दिली की, आरोपी पत्नी नामे आम्रपाली भीमराव हैबते (वय २९ वर्षे, रा. तळेगाव ता. उमरी) हिने तिचा पती भीमराव नागोराव हैबते हा तिच्या चारित्र्यावर संशय घेत होता. अखेर पतीचाच काटा काढायचा प्लॅन ठरवला. विद्युत प्रवाहाने शॉक देऊन तिने पतीचा खून केला. या तक्रारीवरून पो. स्टे. उमरी येथे गु.र.नं. ८५/२०१९ कलम ३०२ भादंवीप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.



सदर गुन्ह्याचा तपास पोनि उत्तम मुंढे यांनी करून भक्कम पुरावे गोळा केले. न्यायालयात आरोपीविरुद्ध दोषारोप दाखल केले. सदर प्रकरणात भोकरचे जिल्हा व सत्र न्यायाधीश मोहम्मद नासिर मोहम्मद सलीम यांनी सरकार पक्षाच्या वतीने पुरावे ग्राह्य धरून आरोपी आम्रपाली भीमराव हैबते हिस कलम ३०२ भादवी अंतर्गत जन्मठेप व ५ हजार रुपये द्रव्यदंड अशी शिक्षा सुनावली आहे. पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली न्यायालयात चालू असलेल्या खटल्यांमध्ये विशेष लक्ष देण्यासाठी Trial Monitoring Cell ची स्थापना करण्यात आली आहे. प्रस्तुत प्रकरणात सरकार पक्षाच्या वतीने सरकारी अभियोक्ता अनुराधा शिवराज डावकरे (रेड्डी) यांनी सरकार पक्षाची बाजू मांडली. संपूर्ण खटल्याचे दरम्यान कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून अंमलदार श्रीनिवास नाईनवाड यांनी कामकाज पाहिले.

## गावठी पिस्तूलसह दोघांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)** – शहरात स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक रवी वाहुळे यांचे पथक गस्त घालत असताना गोपनीय माहितीवरून विनापरवाना बेकायदेशीर गावठी पिस्तूल बाळगणाऱ्या एकास अटक केली.

आरोपीकडून एक पिस्तूल आणि दोन जिवंत काडतूस जप्त करण्यात आले आहेत. अटक केलेला युवक अल्पवयीन असल्याचे सांगण्यात आले. मिळालेल्या माहितीप्रमाणे घटनास्थळी छापा कारवाई केली असता सदर ठिकाणी एक विधीसंघर्षग्रस्त बालक मिळून आला.

## जिल्ह्यास दस्त नोंदणीतून सरकारी तिजोरीत २२१ कोटी ४३ लाख जमा

**नांदेड (प्रतिनिधी)** –प्रशासकीय पारदर्शकता आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यामुळे नांदेड जिल्ह्यातील नोंदणी व मुद्रांक विभागाने सन २०२५–२६ या आर्थिक वर्षात लक्षणीय टप्पा गाठला आहे. जिल्ह्यातील १८ सह दुय्यम निबंधक कार्यालयांच्या माध्यमातून तब्बल ६५ हजार ६७४ दस्तांची नोंदणी झाली आहे. याद्वारे शासनाला २२१ कोटी ४३ लाख रुपयांचा महसूल मिळाला आहे. विशेष म्हणजे याच काळात ३४४ विशेष विवाहाची नोंद देखील यशस्वीरित्या झाली आहे.

सह जिल्हा निबंधक वर्ग–१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी विभागाच्या कामकाजाबाबत माहिती देताना सांगितले की, कार्यालयात येणाऱ्या नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी आणि त्यांना माहिती देण्यासाठी कार्यालयात एक विशेष कक्ष तयार केला आहे. त्या माध्यमातून नागरिकांना महाराष्ट्र शासनाने घेतलेले महत्त्वाचे निर्णय आणि योजनांची माहिती दिली जात आहे. तसेच त्यासंबंधी सर्व सह दुय्यम कार्यालयातील दर्शनी भागात फलक लावण्यात आले आहेत. जनतेच्या सोयींसाठी शासनाने विविध योजना जाहीर केल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने सुट्टीच्या दिवशीही दस्त नोंदणीचे काम सुरू असून, दस्त नोंदणीसाठी नागरिकांना वेळ मिळावा यासाठी दर शनिवारी आणि रविवारी देखील जिल्ह्यातील एक सह दुय्यम निबंधक कार्यालय सुरू ठेवण्यात आले आहे. 'एक जिल्हा एक नोंदणी' या संकल्पनेमुळे आता पक्षकार आपल्या सोयीनुसार जिल्ह्यातील कोणत्याही कार्यालयात दस्त नोंदणी करू शकतात. यामुळे पक्षकार यांना जवळ असलेल्या कार्यालयात जाऊन दस्ताची नोंदणी शक्य झाली असून, त्यांना लांबवरचा प्रवास टाळता येतो. महिलांच्या नावे निवासी मिळकत खरेदी होत असेल तर शासनाने महिलांना मुद्रांक शुल्कमध्ये १ टक्के सवलत दिली आहे. जमीन महसूल संहिता १९६६ यांच्या कलम ८५ अन्वये सहधारकांनी निष्पादित केलेल्या शेतजमिनीच्या वाटपाच्या संलेखावर तसेच वडिलोपार्जीत शेतजमिनीबाबत वारसाने हक्क प्राप्त झालेल्या सर्व सहधारकांनी निष्पादित केलेल्या वाटणीपत्रास नाममात्र नोंदणी फी १०० रुपये इतकी केली आहे.

शेतजमिनीच्या वादावर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी आणि ग्रामीण भागातील सामाजिक सलोखा राखण्यासाठी शासनाने सलोखा योजना सुरु केली आहे. या योजनेअतर्गत वादातील असलेल्या शेत जमिनीचे अदलाबदल अत्यल्प मुद्रांक शुल्क १ हजार रुपये व नोंदणी फी १ हजार रुपये इतके कमी करण्यात आले आहे. तसेच शासनाच्या इतर योजनांची माहिती देण्यात आली आहे.

## सांची जोंधळे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** – शहरातील जनता कॉलनी येथील रहिवाशी कुमारी सांची पृथ्वीराज जोंधळे (वय २८) यांचे अल्पशा आजाराने बुधवार, दि. ६ मे रोजी दुपारी १२.३० वाजता निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर बुधवारी सायंकाळी ७.३० वाजता गोवर्धन घाट येथील स्मशान–भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई वडील, दोन बहिणी, एक भाऊ असा परिवार आहे.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com